12 FEB 2017 तरुण भारत शिवाज

# बंगालचा बवाल, केरळच्या सरमसह वि

## दिवसभरात विविध कलाप्रकारांचे सादरीकरण : राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी

प्रतिनिधी
कोल्हापूर

पौराणिक कथांवर आधारीत बंगालचा बवाल हा नाट्यप्रकार, अंतर्मुख करणारी केरळची सरम, माळामुली, अरमनी, चेल्लंबी, वट्टचंडी, उकेम ही वाद्ये अशा वैविध्यपूर्ण लोककलांचे आणि परंपरांचे अभिजात दर्शन शनिवारी युवा महोत्सवात घडले. देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपापल्या प्रदेशातील लोककला सादर केल्या.

शिवाजी विद्यापीठातील ३२ व्या युवा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी १४ विद्यापीठांनी आपल्या प्रदेशातील लोकसंगीत सादर केले. यामध्ये तेजल विद्यापीठ आसाम, युनिव्हर्सिटी ऑफ केरला, गुवाहाटी युनिव्हर्सिटी ऑफ आसाम, संत गाडगे महाराज विद्यापीठ आमरावती यांच्या लोकसंगीत सादरीकरणानंतर प्रेक्षकांनी टाळ्या, शिट्ट्यांची दाद दिली.

युवा महोत्सवाच्या निमित्ताने आलेल्या देशभरातील तरुणांनी आपल्या अनेक कला कौशल्याची झलक दाखवली. शनिवारी दिवसभरात एकांकिका स्पर्धा, शास्त्रीय वाद्य वादन, पाश्चिमात्य वैयक्तिक व समूह गायन स्पर्धा, कोलाज, पोस्टर मेकिंग, प्रश्नमंजुषा अशा अनेक स्पर्धांमध्ये दिवसभर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील कलाकार विद्यार्थ्यांनी देभरातील कलांचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.

लोककला केंद्रात वेस्टर्न सोलो प्रकारातील गीतगायनाच्या स्पर्धांना सुरवात झाली. आपल्याकडे फारसा प्रचलित नसलेला हा गायनप्रकार ऐकण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. कानपूर, पुणे, पश्चिम बंगाल, केरळ, बंगळुरू, वाराणसी, आणंद–गुजरात, नागालँड, मुंबई, नागपूर, अमरावती, अलिगढ, अमृतसर आदी विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनी सुंदर सादरीकरण केले. दुपारच्या सत्रात पाश्चात्य समूहगीत गायन स्पर्धा पार पडल्या. 'टायटॅनिक', 'लायन किंग'सह अनेक लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करून विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या संघांनी ही सायंकाळी श्रवणीय आणि रंगतदार बनविली.



कोल्हापूर : महाराजा कृष्णाकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठा गुजरातच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लोकसंगीतातील एक

### आज होणाऱ्या स्पर्धा

सकाळी ९.३० वाजता– वादविवाद (नीलांबरी सभागृह), इन्स्टॉलेशन (मानव्यविद्या इमारत),
सकाळी १० वाजता– सुगम गायन (भारतीय) (लोककला केंद्र), एकांकिका (वि.स. खांडेकर भाषा भवन),
दुपारी १ वाजता– क्विझ (अंतिम फेरी) (नीलांबरी सभागृह), व्यंगचित्रकला (मानव्यविद्या इमारत)
दुपारी २ वाजता– समूहगीत (भारतीय) (लोककला केंद्र),
दुपारी ४ वाजता– शास्त्रीय गायन (संगीत अधिविभाग), क्ले–मॉडिलिंग (संगीत अधिविभाग)
सायंकाळी ६ वाजता– मूकनाट्य (भाषा भवन)

लोककला केंद्रात पाश्चात्य संगीताच्या सुरावटींवर सादरीकरण करत असतानाच संगीत अधिविभागाच्या सभागृहात भारतीय संगीताच्या लय आणि ठेक्यांवर विद्यार्थ्यांनीही ताल धरला. संगीत अधिविभागात सकाळच्या सत्रात सूरवाद्यांची तर दुपारच्या सत्रात तालवाद्यांची स्पर्धा झाली. सूरवाद्यांमध्ये बासरी, व्हायोलीन, सारंगी, सरोद इत्यादी तर, तालवाद्यांमध्ये तबला, पखवाज, मृदंग आदी वाद्यांवर देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शास्त्रीय वादन कौशल्यांनी वातावरण मंत्रमुग्ध केले. शास्त्रीय संगीताला दाद देण्यासाठी जाणकार रसिकांबरोबरच तरुण–तरुणींची लक्षणीय उपस्थिती होती. आजची तरुणाई शास्त्रीय संगीत ऐकत नाही, या म्हणण्याला त्यांच्या उपस्थितीमुळे जणू उत्तरच मिळाले.

वि.स. खांडेकर भाषा भवन सभागृहात नाट्यकर्मी आणि रसिक चाहत्यांची मोठी गर्दी झाली होती, एकांकिका स्पर्धा पाहण्यासाठी. देशभरातून आलेल्या विद्यापीठांच्या संघांचे सादरीकरण, त्यांचे विषयांचे वैविध्य आणि सादरीकरणातील गुणवैशिष्ट्ये, त्यांचे नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा या सर्वच गोष्टी उल्लेखनीय होत्या.

या साऱ्या विविधतेमधूनही एकांकिका सादरीकरणाचा एकात्म अनुभव देण्यात रंगकर्मी विद्यार्थीही यशस्वी झाले. आज एकूण पंधरापैकी आठ विद्यापीठ संघांनी एकांकिका सादर केल्या. त्यामध्ये जामिया मिलिया इस्लामिया, नवी दिल्ली, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, राणी दुर्गावती विद्यापीठ, जबलपूर, चंदीगढ विद्यापीठ, मोहाली,

### लोकसंगीताच्या तालावर थिरकली तरुणाई

सायंकाळी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात लोकसंगीत ऑर्केस्ट्राच्या स्पर्धा झाल्या. या स्पर्धा पाहण्यासाठी तरुण विद्यार्थी–विद्यार्थिनींबरोबरच कोल्हापुरातील लोकसंगीत प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. हा लोकसंगाताचा कार्यक्रम म्हणजे जणू भारताच्या समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविणारा एक नयनरम्य सोहळाच ठरला. यामध्ये पंजाबी, गुजराती, आसामी, केरळी, कर्नाटकी, बंगाली, महाराष्ट्रीय, हरयाणवी, दाक्षिणात्य लोकसंगीताचे प्रगल्भ दर्शनच विद्यार्थ्यांनी घडविले. आपापल्या राज्यांच्या लोकसंस्कृतीचा, लोकपरंपरेचा अभिमान त्यांच्या या सादरीकरणातून ओसंडून वाहात होता. सुमारे तीन तास चाललेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकून घेतली.

### सेल्फी काढण्यात तरुणाई दंग

देशभरातून आलेल्या या तरुण कलाकारांना कोल्हापूरातील युवामहोत्सवातील आठवणी कैद करण्याचा मोह आवरला नाही. विद्यापीठात आकर्षक सजावट करण्यात आलेल्या अनेक ठिकाणी हे पाहुणे कलाकार सेल्फि घेण्यासाठी गर्दी करताना दिसले. इतकेच नाही तर विद्यापीठ परिसरातील जैवविविधताही कॅमेऱ्यात कैद केली.

### विद्यार्थी दिवसभर रंगीत तालमीत व्यस्त

दिवसभर विद्यापीठ परिसरात विविध कलाप्रकाराच्या रंगीत तालमी घेताना विद्यार्थी दिसत होते. आपला कलाप्रकार इतरांपेक्षा कसा चांगल्या प्रकारे सादर करता येईल यासाठी विद्यार्थ्यांचा अटोकाट प्रयत्न दिसत होता. स्पर्धक आपापल्या सादरीकरणाची तयारी करताना दिसले. पारंपरिक वाद्ये, रंगबेरंगी पोषाख याने या रंगीत तालमी अधिकच आकर्षक बनल्या.

जनसंपर्क कक्ष
विद्यापीठ, कोल्हापूर

# विध लोककलांचे अभिजात दर्शन...

## फुलला विद्यापीठ परिसर : ठिकठिकाणी रंगल्या रंगीत तालमी




क्षण, तर दुसऱ्या छायाचित्रात गुवाहाटी विद्यापीठ आसामच्या कलाकार विद्यार्थ्यांनी सादर लोकसंगीतातील एक क्षण.



वेस्टर्न सोलो स्पर्धेत बेंगलोर विद्यापीठाची सहभागी स्पर्धक.

मुंबई विद्यापीठ, चौधरी रणबीर सिंग विद्यापीठ, जिंद, हरियाणा, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई आणि सोलापूर विद्यापीठ या संघांचा समावेश होता. महिलांचे शोषण आणि त्यांचे प्रश्न, नक्षलवाद व जातीयवाद, अश्वत्थामा, चार्ली चॅप्लीनची प्रेरणा, भारत-पाक सीमाप्रश्न आणि माणुसकी आदी विषयांवर एकांकिका सादर केल्या. उद्या उर्वरित विद्यापीठांच्या एकांकिकांचे सादरीकरण होणार आहे.

मानव्यविद्या इमारतीमध्ये सकाळच्या सत्रात पोस्टर मेकिंग तर दुपारच्या सत्रात कोलाज मेकिंगच्या स्पर्धा झाल्या. पोस्टर मेकिंगसाठी विद्यार्थ्यांना ऐनवेळी 'स्वच्छ वातावरण, स्वस्थ जीवन' असा विषय देण्यात आला. १५ विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला. एकच विषय असूनही त्याच्या मांडणीतील आणि कल्पनांतील वैविध्य चित्ताकर्षक होते. पर्यावरणाची अनेकविध दृष्ये विद्यार्थ्यांच्या मनातून थेट कागदावर विविध रंगांच्या मिश्रणातून साकारताना पाहणे हा एक आनंददायी अनुभव ठरला.

कोलाज मेकिंग हा विषय तर विद्यार्थ्यांच्या सृजनाचा एक अनोखा अनुभवच देणारा होता. जुनी वर्तमानपत्रे आणि मासिकांचे जुने कागदांचे कपटे कॅनव्हासवर एकत्र येऊन बहुरंगी, बहुढंगी स्वरुप आणि नवेच आकार धारण करीत होते.

यामध्ये निसर्गचित्र, नितांतसुंदर वृक्षवेल, थुईथुई नाचणारा मोर आणि चित्ताकर्षक रंगावली असे एक ना अनेक विषयांनी विद्यार्थ्यांचे कॅनव्हास सजले होते.

वनस्पतीशास्त्र अधिविभागा नीलांबरी सभागृहात सका सत्रात प्रश्नमंजुषा

### 'चित्र-विचित्र' नाटक काय आहे

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने सादर केलेल्या 'चित्र-विचित्र' या सत्य घटनेवर आधारित नाटकाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. पथनाट्यातून प्रबोधन करणाऱ्या दाम्पत्याला नक्षलवादी ठरवून तुरूंगात डांबले जाते. कोणतीही चूक नसताना तरूणपणातील ४ वर्षे तुरूंगात काढाव्या लागणाऱ्या या दाम्पत्याच्या भावना या नाटकातून दिग्दर्शक विशाल तराळ यांनी प्रभावीपणे मांडल्या आहेत. समाज, प्रशासन, पोलिस या व्यवस्थांच्या ढिसाळ कामावर परखडपणे चाबकाचे फटकारे ओढण्याचे काम या नाटकाने केले असल्याच्या प्रतिक्रीया प्रेक्षकांमधून येत होत्या.

झाली. आजच्या स्पर्धेत १५ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले. त्यातील सहा संघांची उद्या दुपारी १ वाजता होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे.

दुपारच्या सत्रात येथे 'स्वच्छ भारत' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा झाली. या स्पर्धेत इंदूर, नवी दिल्ली, पंजाब, पश्चिम बंगाल, नागपूर, थिरुअनंतपुरम, गुजरात, ग्वाल्हेर, कोट्टयाम, मिदनापूर, अमृतसर, कोईमतूर आदी ठिकाणच्या विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

| | |
|---|---|
| ४ | दु.१२ वा. दु.३ वा. सायं. ६वा., रात्री ९वा. |
| ३<br>१ | दु.१ वा., दु. ४ वा., रात्री १० वा. सायं ७ वा. |
| ४ | दु.१२॥ वा, दु.३॥ वा. सायं. ६॥ वा, रात्री ९॥ वा. |
| ४ | दु.१२॥, दु.३॥ वाजता सायं. ६॥, रात्री. ९॥ वा. |
| – | – – |
| ४ | दु.१२॥, दु.३॥ वाजता सायं. ६॥, रात्री. ९॥ वा. |
| १<br>२<br>१ | दु.१२॥ वा.<br>दु. ३॥ वा., रात्री. ९॥ वा.<br>सायं. ६॥ वा. |
| ३ | दु. ३॥ वा. सायं. ६॥ वा., रात्री. ९॥ वा. |

कडक धोरण स्वीकारणे गरजेचे आहे, अन्यथा उद्योगपती विजय मल्ल्याप्रमाणे आणखी काही थकबाकीदार देश सोडून जातील, अशी भीती या तज्ज्ञांमधून व्यक्त होत आहे.

### बड्या उद्योगपतींमुळे सार्वजनिक बँक व्यावसाय अडचणीत

बँकांच्या उलाढालीत उद्योगांना दिलेल्या कर्जाचा वाटा मोठा आहे. लहान व्यवसायाऐवजी मोठ्या उद्योगांना बँकांनी भरमसाठ कर्जे दिली आहेत. कार्पोरेट उद्योगात बँकांची ४२ टक्के गुंतवणूक आहे. अन्य कारणाने उद्योगतींची कर्जे थकल्याने कर्जाची पुर्नरचना करण्यात आली. एकुण व्यवहाराच्या तब्बल ६८ टक्के कर्जाची फेररचना केली आहे. मात्र वसुलीकडे दुर्लक्ष केल्याने ८२ टक्के कर्ज पुन्हा वितरण केले आहे. त्यातील थकबाकीचे प्रमाण ८ टक्के आहे. आणखी काही दिवसता थकीत कर्जाचे प्रमाण २३ टक्क्यांवर पोहचेल आणि देशातील सार्वजनिक क्षेत्रातील आणखी २५ बँका अडचणीत येतील. अशी भीती बँकींग क्षेत्रातील तज्ज्ञ देविदास तुळजापूरकर यांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार आजच्या थकित कर्जात करोडपती थकबाकीदारांचा वाटा ७० टक्केच्या वर आहे. त्यांच्याकडून एकुण कर्जाच्या ४० टक्केच्यावर थकबाकी आहे. यामुळे सार्वजनिक बँकींग क्षेत्र बड्या उद्योगपतीमुळे अडचणीत आला आहे. हा प्रकार म्हणचे हेतुत: बँकांची कर्जे थकवण्याचा प्रकार आहे. असा आरोपही तुळजापूरकर यांनी केला आहे.

## महोत्सवात आज

- सकाळी ९.३० वाजता : वादविवाद (निलांबरी सभागृह, बॉटनी), इन्स्टॉलेशन (मानव्यशास्त्र इमारत)
- सकाळी १० वाजता : सूरवाद्य वादन (लोककला केंद्र), एकांकिका (वि. स. खांडेकर भाषाभवन) मराठीवाङ्मय (संगीत व नाट्यशास्त्र विभाग)
- दुपारी १ वाजता : प्रश्नमंजूषा अंतिम फेरी (निलांबरी सभागृह), व्यंगचित्रे (मानव्यशास्त्र इमारत)
- दुपारी २ वाजता : समूहगीत (लोककला केंद्र)
- दुपारी ४ वाजता : शास्त्रीय वाद्यवादन (संगीत व नाट्यशास्त्र विभाग)
- सायंकाळी ६ वाजता : मूकनाट्य (लोककला केंद्र).

# वेगळेपणाद्वारे 'त्यांनी' वेधले लक्ष



फियामा (बंगलोर युनिव्हर्सिटी)



श्रीकुट्टी (शंकराचार्य युनिव्हर्सिटी)



राजकुमारी सानाथोंय (मणीपूर युनिव्हर्सिटी)



उमंग गज्जर (गुजरात युनिव्हर्सिटी)

कोल्हापूर : तरुणाईच्या नावीन्यपूर्ण कल्पना, कलांच्या सादरीकरणाने 'शिवोत्सव' रंगत आहे. खिलाडूवृत्तीने कला सादरीकरणाबरोबरच केशभूषा, वेशभूषेचे विविध प्रकार महोत्सवात पाहायवास मिळत आहेत. पण काही विद्यार्थी कलाकारांनी शनिवारी इतरांचे लक्ष वेधून घेतले.

यामध्ये मृणा रेहा मेरुला सादर या आसामी पेहरावात गुवाहाटी विद्यापीठाची विद्यार्थिनी जीना मोनीका ही लोककला वाद्यवृंदात सहभागी झाली होती. तिच्याशी इतर युवतींनी आवर्जून हस्तांदोलन केले. हसरा चेहरा, प्रभावी व्यक्तिमत्त्व कलाकार सहज साकारू शकतो हे तिने दाखवून दिले.

अंगावर कोट आणि रेडफनिंग हा मणीपूरचे वैशिष्ट्य असलेला पेहरावसुद्धा तितका देखणा आहे, तितकाच साधेपणातील उत्स्फूर्त दर्शविणारा असल्याचे मणीपूर विद्यापीठाच्या राजकुमारी सानाथोंय हिने दाखवून दिले. लांबसडक केस, गळ्यात चपटया पातीचा व त्यावर नक्षी असलेला तांबूस रंगाचा हार आणि रेड मोठ्या चेक्सचा शर्ट, काळ्या रंगाची पँट असा पेहराव आणि त्यातून जिंकण्याचा आत्मविश्वास दाखवीत स्मितहास्य करणाऱ्या बंगलोर युनिव्हर्सिटीच्या फियामा ही विद्यार्थिनी लक्षवेधक ठरली.

शंकराचार्य युनिव्हर्सिटीचा विद्यार्थी श्रीकुट्टी हिचे भरजरी कुर्ता, काळी पँट आणि लांब केस अशा स्वरूपातील व्यक्तिमत्त्व केरळच्या संस्कृतीचे दर्शन नेमकेपणाने दाखवीत होते.

गुजरात युनिव्हर्सिटीचा उमंग गज्जर याने निळा सलवार-कुर्ता, चेहऱ्यावर कोरलेली दाढी आणि भरगच्च केसांची रचना यातून वेगळेपणा दाखविला. या सर्वांनीच शनिवारी दिवसभरात अन्य युवक-युवतींचे लक्ष वेधून घेत आपल्या प्रांतिक संस्कृतीचे दर्शन घडविले. (प्रतिनिधी)

## आठवणीसाठी 'सेल्फी'

**वेगळ्या पेहरावातून लक्ष वेधून घेणाऱ्या संबंधित युवक-युवतींसमवेत अन्य स्पर्धक संघातील विद्यार्थी, प्रेक्षकाच्या भूमिकेतील काही विद्यार्थी-विद्यार्थिनींनी त्यांना विनंती करून 'सेल्फी' घेतले. त्यांनीदेखील एक आठवण म्हणून त्यांना हसतमुखाने प्रतिसाद दिला.**



राष्ट्रीय पातळीवरील युवा महोत्सवात देशभरातील विविध संस्कृती, परंपरांचे दर्शन तर घडलेच; तसेच अनेक नव्या गोष्टी शिकायलाही मिळाल्या.

- वत्रलालीम पालनी, बंगलोर विद्यापीठ



आम्ही पाश्चिमात्य गायनकला प्रकार सादर करण्यासाठी आलो आहोत. इथले वातावरण स्पर्धात्मक न वाटता खूपच मैत्रीपूर्ण आहे. महोत्सवासाठी महाराष्ट्रात पहिल्यांदाच आल्याने खूप छान वाटत आहे.

- अरविंद मोहन, केरळ विद्यापीठ

# महाराष्ट्रातील युवकांना चांगल्या सुविधा

## वेगळ्या संस्कृतीचा अनुभव

**कोल्हापूर :** महाराष्ट्रात युवकांना चांगल्या सुविधा आहेत. कोल्हापूरचे वातावरण चांगले आहे. येथे एका वेगळ्या संस्कृतीचा अनुभव घेत आहोत, अशा भावना मणिपूर व चंदीगड युनिव्हर्सिटीच्या युवक-युवतींनी शनिवारी व्यक्त केल्या.

मणिपूर युनिव्हर्सिटीमध्ये बी.एड. करणारा सरबजित याने कोल्हापुरातील वातावरण जरा उष्ण असल्याचे सांगत बोलायला सुरुवात केली. त्याने सांगितले की, महाराष्ट्र हे विकसित राज्य असून, येथे युवकांना चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत. आमचे राज्य विकासाच्या दिशेने पावले टाकत आहे. महाराष्ट्राप्रमाणे आम्हा युवकांना सुविधा मिळाल्यास निश्चितपणे आमच्याही विकासाची गती वाढेल, असे सांगितले. राज्य साक्षरतेच्या प्रमाणात महाराष्ट्राच्या पुढे असणाऱ्या मणिपूरमध्ये सध्या नागालँड जमातींनी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्त्रियांच्या ३३ टक्के आरक्षणाला विरोध केला आहे. याबाबत मणिपूर युनिव्हर्सिटीतील संगीत विषयाचे शिक्षण घेणाऱ्या धनमंजुरी आणि बी.एड. करणाऱ्या विद्यार्थ्यांनी यांना विचारले असता त्यांनी काहीच उत्तर दिले नाही. मात्र, कोल्हापूरचे वातावरण चांगले असून, आपल्याला आवडल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. चंदीगड युनिव्हर्सिटीच्या संघाचा नाट्यदिग्दर्शक असलेल्या कौशल्य देवगण्ने वातावरण, जेवण आणि संवाद साधण्याच्या एक वेगळ्या संस्कृतीचा आम्ही अनुभव घेत आहोत. विविधतेमध्ये एकता असल्याचे म्हणायचे आणि कोल्हापुरात येऊन आपल्याच भागातील जेवणाचा आग्रह धरण्यात काही अर्थ आहे का? आम्हाला कोल्हापूरच्या जेवणाबाबत काहीच माहीत नाही. मात्र, एक अनुभव म्हणून त्याचा आनंद लुटत असल्याचे त्याने सांगितले. (प्रतिनिधी)

## सेल्फीसाठी गर्दी

महोत्सवाच्या निमित्ताने तरुणाईचे एड्सबद्दल प्रबोधन व्हावे यासाठी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, सीपीआर रुग्णालय यांच्यातर्फे लोककला केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळच उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटवर विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.



## 'दिल, दोस्ती दोबारा...'

कलाप्रकारांचे उत्कृष्टपणे सादरीकरण करून संघातील अन्य सहकाऱ्यांना चिअर-अप करण्यासाठी शनिवारी अनेकांची धावपळ सुरू होती. सादरीकरण संपलेल्या काही युवक-युवती गटाने महोत्सव परिसरातून फिरत होते. यातील काहीजण आपल्या सहकाऱ्यांसमवेत 'सेल्फी' घेत होते. काहीचे रंगमंच, रंगीत तालीम सुरू असलेल्या ठिकाणी, मोकळ्या जागेत 'फोटोसेशन' सुरू होते. चेष्टा-मस्करी, विनोदी शेरेबाजी करत काहीजण महोत्सवाचा आनंद लुटत होते. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर या विभागांतील महोत्सवात काहीजणांची मैत्री झाली होती. नवीन मित्र-मैत्रिणी झालेल्यांची ओळख परेड, गप्पा रंगल्या होत्या. एकूणच दिवसभरात महोत्सवात 'दिल, दोस्ती, दोबारा'चे चित्र दिसून आले.

**कलाप्रकारांचे सादरीकरण** : पोस्टर मेकिंग, शास्त्रीय वादन, एकांकिका

# महोत्सवावर युवा पिढीच्या सर्जनशीलतेची छाप

**कोल्हापूर** : देशभरातील विविध विद्यापीठांतून आलेल्या युवा पिढीने आपल्या सर्जनशीलतेची छाप 'शिवोत्सवा'त पाडली. यावेळी पोस्टर मेकिंग, शास्त्रीय सुरवादन, पाश्चिमात्य गायन, कोलाज, एकांकिका, आदी कलाप्रकारांच्या सादरीकरणातून त्यांनी शनिवारी आपल्या कौशल्याची चुणूक दाखविली.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्राची सुरुवात प्रश्नमंजूषेने झाली. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील लिलावती सभागृहात झालेल्या या स्पर्धेत देशभरातील तरुणाईने आपल्या बुद्धिमत्तेची चमक दाखविली. तसेच इलोक्युशन स्पर्धेतही 'स्वच्छ भारत' या विषयावर विचार मांडले. याच वेळी संगीत व नाट्यशास्त्र विभागात शास्त्रीय सुरवादन स्पर्धा रंगली होती. सकाळच्या प्रसन्न वातावरणात सुमधुर सुरावटीत गायक-कलाकारांनी बासरी, सारंगी, व्हायोलीन, इसराज या वाद्यांच्या माध्यमातून देस, जोग, टोडी असे विविध राग सादर केले; तर मानव्यशास्त्र इमारतीत कुंचल्याच्या साहाय्याने स्वच्छ भारत, सेव्ह अर्थ, निसर्गाशी मैत्री, मानवापेक्षा पृथ्वी श्रेष्ठ असे संदेश पोस्टर मेकिंगमधून दिले.

## एकांकिकेतून चार्ली चाप्लीनचा जीवनपट

आपली दुःखे लपवून जगाला हसविणाऱ्या चार्ली चाप्लीनच्या जीवनावर भाष्य करणाऱ्या 'चार्ली चाप्लीन' या चंदीगड विद्यापीठाच्या कलाकारांनी सादर केलेल्या एकांकिकेला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

भारतीय संगीताबरोबरच पाश्चिमात्य संगीतावर आमचे तितकेच प्रेम आहे, असे सांगत विविध ग्रुप्सनी बहारदार गीतांचे सादरीकरण केले. लोककला केंद्रात रंगलेल्या या स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक अशा स्वरूपांतील या स्पर्धेचा आस्वाद घेण्यासाठी विविध महाविद्यालयांतील तरुण-तरुणींनी गर्दी केली होती. याच वेळी भि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये एकांकिका स्पर्धा रंगल्या. त्यामध्ये वर्तमान सामाजिक, राजकीय वास्तवावर भाष्य करणाऱ्या आठ एकांकिका सादर करण्यात आल्या; तर मानव्यशास्त्र विभागात कोलाज स्पर्धेत आपल्या कल्पकतेतून विविध कल्पना रंगीबेरंगी कागदांच्या साहाय्याने निर्माण केल्या.

**उत्साह कायम :** शिवाजी विद्यापीठाचा परिसर फुलला-खुलला

# तरुणाईचा कलाविष्कार बहरला

**कोल्हापूर :** टाळ्या-शिट्ट्यांचा गजर, प्रतिसादाची साद, तालमयपूर्ण जल्लोष, कलेच्या देखण्या सादरीकरणाला उत्स्फूर्तपणे मिळणारी दाद्या अशा जोशपूर्ण वातावरणात 'शिवोत्सव' या ३२व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवाचा दुसरा दिवस रंगला. तरुणाईचा कलाविष्कार फुलला-खुलला आणि विद्यापीठाचा अख्खा परिसर शनिवारी सांस्कृतिक कलेच्या प्रेमात पडला.

देशाच्या विविध भागांतून हजारो मैलांचा प्रवास करून सुमारे १३०० विद्यार्थी कलाकार शिवाजी विद्यापीठात दाखल झाले आहेत. जल्लोषी वातावरण, सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या शोभायात्रेने महोत्सवाचा शुक्रवारी प्रारंभ झाला. महोत्सवातील शनिवारची सकाळ शास्त्रीय सुरवादनाने झाली. प्रश्नमंजूषा, पोस्टर मेकिंगवर एक नजर टाकून युवक-युवतींनी पाश्चिमात्य समूहगायन ऐकण्यासाठी दुपारी लोककला केंद्रात हजेरी लावली. तब्बल दोन तास त्यांना पाश्चिमात्य समूहगीतांच्या सादरीकरणाने उपस्थित तरुणाईला ताल धरायला लावला. काहींनी वक्तृत्वातून 'स्वच्छ भारत'ची मते जाणून घेतली, तर काहींनी कोलाजमधील पर्यावरण रक्षणाचा संदेश जाणून घेतला. लोककला वाद्यवृंदाचे सादरीकरण पाहण्यासाठी सायंकाळी पाच वाजल्यापासून तरुणाईची पावले लोककला केंद्राकडे वळू लागली. काही वेळातच



पश्चिम बंगालच्या जादवपूर विद्यापीठाच्या सामरिका दासने पर्यावरण व आरोग्यावर आधारित पोस्टर तयार केले.



वाद्यवृंद स्पर्धेत यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने महाराष्ट्राच्या कला-संस्कृतीचे दर्शन घडविले.


बनारस विद्यापीठाच्या प्रशांत मिश्राने व्हायोलिनवर राग सादर केला.

तरुणाईच्या गर्दीने केंद्र हाऊसफुल्ल झाले. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास गुजरातमधील भावनगरच्या महाराजा कृष्णकुमारसिंहजी विद्यापीठाच्या संघाने लोककला वाद्यवृंदाच्या सादरीकरणाची सुरुवात केली.

पारंपरिक गुजराती वेशभूषेत त्यांनी दमदार सादरीकरण केले. गुवाहाटी विद्यापीठाने आसामच्या लोकसंगीताची सफर घडविली. केरळच्या कालिकत विद्यापीठाने उपस्थितांना नृत्याचा ठेका धरायला लावले. विद्यासागर विद्यापीठाने पश्चिम बंगालची कला-संस्कृती व्यासपीठावर साकारली. गुजरात विद्यापीठाने कार्यक्रमाची रंगत वाढविली. तीन तासांहून अधिक वेळ लोककला वाद्यवृंदाच्या सादरीकरणाने महोत्सवात उत्साह भरला. यात १४ संघ सहभागी झाले होते. दरम्यान, शनिवारी दुपारी काही संघ विद्यापीठात दाखल झाले. यात काश्मीर विद्यापीठ, छत्रपती शाहूजी युनिव्हर्सिटी कानपूर, माखनलाल चतुर्वेदी युनिव्हर्सिटी ऑफ जर्नालिझम अँड कम्युनिकेशन, भोपाळ, आदींचा समावेश होता. 'शिवोत्सव'मधील सहभागी संघांची संख्या ७५वर पोहोचली आहे. (प्रतिनिधी)

## रांगड्या परंपरेचे दर्शन

महोत्सवात शनिवारची सायंकाळ लोककला वाद्यवृंदाने रंगली. यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, मुंबई विद्यापीठांनी महाराष्ट्राच्या रांगड्या परंपरेचे दर्शन घडविले. त्यांनी भूपाळी ते लावणीपर्यंतच्या संगीताचे सादरीकरणाने उपस्थितांना डोलायला लावले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थित टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात दाद देत होते. काहींना तर नृत्य करण्याचा मोह आवरता आला नाही.



जीना मोनीडिका (गुवाहाटी युनिव्हर्सिटी)

## सकाळपासूनच सराव

महोत्सवासाठी आलेल्या विविध राज्यातील संघांनी आपल्या नाटक, एकांकिका, नृत्यप्रकारांचा मानव्यशास्त्र विभागाच्या इमारतीच्या बाजूला नव्यानेच तयार करण्यात आलेल्या हिरवळीवर सरावाला सुरुवात केली होती. यावेळी विद्यापीठ परिसरात मॉर्निंग वॉकला आलेले नागरिक थांबून त्यांचा सराव पाहत होते व त्यांचे कौतुक करीत होते.

संकलन : **संतोष मिठारी, संतोष तोडकर, आयुब मुल्ला**




कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठामधील 'शिवोत्सव' या ३२ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात शनिवारी लोककला वाद्यवृंद स्पर्धा रंगली. यात आसामच्या गुवाहाटी युनिव्हर्सिटीच्या सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. (सर्व छाया : दीपक जाधव)

## पाश्चिमात्य संगीताची जादू!

महोत्सवात पाश्चिमात्य संगीताचे सूर बरसले. लोककला केंद्रात सकाळपासून सुरू असलेल्या या स्पर्धेत तरुण-तरुणाई स्वत: तयार केलेल्या गाण्यांसोबतच बोन जोन्स, लेडी गागा, अॅडेल, टायलर स्विफ्ट, रिहाना या पाश्चिमात्य प्रसिद्ध गायकांच्या रचना सादर केल्या. त्यास उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद तर दिलीच; पण त्याबरोबर त्यांच्या गाण्यांवर ठेकाही धरला. विविध भाव प्रकट करणाऱ्या गीतांमुळे वातावरणात चैतन्य पसरले होते.



अभिजात शास्त्रीय संगीताचा गोडवा, वेस्टर्न सोलो साँग, एकांकिकांच्या व्यासपीठावर युवकांनी सादर केलेला बहारदार अभिनय, पाश्चिमात्य गाण्यांचा थिरकायला लावणारा ठेका, सामाजिक जाणिवांवर भाष्य करणाऱ्या कलाकृती आणि गझल गायनही. अशा अनेकविध प्रकारांतून शिवोत्सव या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाचा जल्लोष रविवारी टिपेला पोहोचला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि चैतन्यदायी वातावरणामुळे महोत्सवात चांगलाच रंग भरला. लोककला केंद्रातील सांस्कृतिक कार्यक्रम, भाषा भवनमधील एकांकिका स्पर्धेलाही हाऊसफुल्ल गर्दी झाली.



गुजरात येथील गणपत युनिव्हर्सिटीच्या टीमची तयारी.

# तरुणाईच्या कलागुणांना बहर

**कोल्हापूर टाइम्स टीम**

टाळ्या-शिट्यांचा गजर, एकांकिकांसह कलेच्या सादरीकरणाला मिळणारी उत्स्फूर्त दाद आणि अखंड सुरू असलेल्या युवकांचा जल्लोष असे वातावरण ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या (शिवोत्सव) तिसऱ्या दिवशीही दिसले. रविवारी सकाळपासून एकांकिका, कोलाज आणि फाइन आर्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला आणखी बहर आला. सोमवारी (ता. १३) स्पर्धा अंतिम टप्प्याकडे पोहोचणार आहे. त्यामुळे सायंकाळी स्पर्धेचा नूरच पालटला. प्रत्येक विभागाचे सादरीकरण, प्रतिस्पर्ध्यांचे सादरीकरण भान हरपून पाहणारे स्पर्धक असा नजारा सोमवारीही पहायला मिळेल.



## गुरू-शिष्याच्या प्रेमाचे दर्शन

शनिवारी वि. स. खांडेकर भाषा भवनात सादर झालेल्या एकांकिकेला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती. ज्यांचे रविवारी सादरीकरण होणार होते, त्या संघांनी शनिवारच्या स्पर्धेला हजेरी लावल्याने स्पर्धेचा नूर लक्षात आला. स्पर्धेतील सहभागी संघांनी जोरदार तयारी केली होती. त्याचा प्रत्यहो तामिळनाडू येथील अमृता विश्व विद्यालयाच्या एकांकिकेतून दिसून आले. 'भगवत अच्युकम्' या सांस्कृतिक एकांकिकेतून गुरू-शिष्याच्या प्रेमाचा ओलावा दर्शविला. ज्ञानाच्या धडपडीसाठी आसुसलेला शिष्य, त्याला त्याच ताकदीचा गुरू भेटल्यास हाच शिष्य सर्वोत्तम ठरतो. पण शिष्य केवळ गुरुवर अवलंबून राहत नाही. तो सतत ज्ञानाची क्षितीजे कवेत घेण्यासाठी प्रयत्नशील असतो, पण तरीही तो गुरू प्रेम विसरत नाही त्याची प्रचिती एकांकिकेतून आली. उत्कृष्ट अभिनय सादरीकरणामुळे प्रेक्षक प्रत्येक वाक्यावर टाळ्यांनी दाद देत होते. यानंतर सादर केलेल्या आसाम येथील कॉटन कॉलेजने सादर केलेल्या एकांकिकेने हास्याचे फवारे उडवले. आंध्रप्रदेश युनिर्व्हसिटीच्या संघाने 'सत्य शिवम् सुंदरम्' ही एकांकिका सादर करुन आपल्या संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडवले. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'वेलकम' ही एकांकिका सादर केली. पूर्णत: सस्पेन्सवर आधारलेल्या कथानकाने प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले.



**शिवोत्सव**

सायंकाळच्या सत्रात कोलकाता येथील विद्यासागर युनिर्व्हसिटी व केरळ युनिर्व्हसिटी ऑफ केरळ संघाने त्याच ताकदीच्या एकांकिका सादर करुन स्पर्धेत रंगत भरली.

## त्रिमितीय कलाकृतीतून सामाजिक जाणिवांवर भाष्य

त्रिमितीय कालकृतीसाठी (इन्स्टॉलेशन) सहभागी संघाना 'स्वप्न' ही थीम देण्यात आली होती. ही संकल्पना सादर करताना विद्यार्थ्यांनी भविष्याचा वेध घेताना सामाजिक जाणिवांवर भाष्य केले. सोलापूर विद्यापीठाने देशातील सैनिकांची स्वप्न साकारले होते. अनेक युवक पैशाच्या मागे धावत असताना देश सेवा आणि बलिदानासाठी तयार असलेला सैनिक त्यांनी तयार केला. पंजाब येथील लवली युनिर्व्हसिटीने टाकाऊ बाटल्यांपासून निर्माण केलेला भोवरा समाजामधील समानतेचे दर्शन घडवत होता. एका बाटलीवर शंभर-दोनशे बाटल्यांच्या बॅलन्स साधून त्यांनी सामाजिक स्तर कशा साधला जाऊ शकतो, याचा परिपाकच दिला होता. राजस्थानच्या केंद्रीय विश्व विद्यालयाने ग्रीन सोसायटी, क्लीन सोसायटीचा संदेश देत प्रदूषण व पर्यावरणाचा समतोल साधण्याचे आवाहन केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नैसर्गिक स्त्रोतांची आवश्यकता त्यांनी त्रिमितीय कालकृतीतून दाखवली. रांची युनिर्व्हसिटीने आजचा युवक शांतता प्रिय असताना, त्याला दहशतवाद्यांचा जाळ्यात कसे ओढले जाते आणि त्यातून तो सुटका कशी करून घेतो, अशी कलाकृती साकारली. गुलबर्गा युनिर्व्हसिटी आणि एसएनडीटी विद्यापीठानेही जागतिक शांतता प्रस्थापित करणारी कलाकृती तयार केली होती.



## वादविवाद स्पर्धेतून प्रगल्भता

वादविवाद स्पर्धेसाठी नोटाबंदी विषय देण्यात आला होता. नोटाबंदी निर्णयाचे समर्थन आणि विरोधात मते मांडताना विद्यार्थ्यांची बौद्धिक प्रगल्भता दिसली. नोटाबंदी सध्याची आणि त्यापूर्वीची असा ताळमेळ घालत त्याचा ग्रामीण अर्थव्यवस्था, लघू व कुटीर उद्योग आणि रोजगारावर झालेल्या परिणामाबाबत विश्लेषणात्मक मांडणी केली गेली. नोटाबंदीच्या निर्णयामुळे देशातील भ्रष्टाचार समुळ नष्ट होईल, असा आशावाद व्यक्त केला जात होता. चार मिनिटांच्या स्पर्धेत मांडणी, आकडेवारी आणि अभिनय कौशल्याचा सुरेख संगम पाहला मिळाला. स्पर्धकांच्या प्रत्येक वाक्यावर प्रेक्षकांच्या टाळ्या पडत होत्या. त्यामुळे विषयाची मांडणी अधिक खुमासदार शैलीत केली गेली.



लोककला भवनातील स्पर्धेवेळी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती.

## महोत्सवात आज

- भाषा भवन : सकाळी ९.३० वा. स्कीट
- मानव्यशास्त्र इमारत : सकाळी ९.३० वा. स्पॉट फोटोग्राफी व स्पॉट पेंटिंग
- लोककला केंद्र : सकाळी १० वा. शास्त्रीय नृत्य
- दुपारी ३ वा. लोकनृत्य व आदिवासी नृत्य
- भाषा भवन : सायंकाळी ५ वा. मिमिक्री





वेस्टर्न ग्रुप गायन स्पर्धेत सहभाग घेतला आहे. गायन स्पर्धेला आकर्षक अशा व्यासपीठाची उभारणी केली आहे. झोनल स्पर्धेत याच प्रकारात पहिला क्रमांक पटकावल्याने राष्ट्रीय युवा महोत्सवात आमची दावेदारी दमदार आहे. मिरवणुकीच्या माध्यमातून आम्हाला राज्याच्या संस्कृतीबरोबरच अन्य राज्यांची तयारी पाहण्याची संधी मिळाली.

\- नेल्सन शर्मा, मणिपूर युनिर्व्हसिटी

छायाचित्र स्पर्धेत सहभागी झालो, असून फोटोग्राफीसाठी आवश्यक असणारी विद्यापीठ परिसरात स्थळे आहेत. महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमातून स्पर्धेच्या नियोजनाची माहिती मिळाली. उत्कृष्ट संयोजन आणि स्पर्धकांची निवास व भोजनाची चांगली व्यवस्था केली आहे. स्पर्धकांमध्ये उत्साह आहे.

\- हिलरी मोसेस, डॉ. हरीसिंग गौर युनिर्व्हसिटी, मध्यप्रदेश

लाइट व्होकल सोलो साँग, पोस्टर मेकिंग, वेस्टर्न साँग, क्लासिकल व्होकल साँग अँड डान्स स्पर्धेत मिदनापूर येथे झालेल्या पूर्व विभागीय महोत्सवात बनारस विद्यापीठाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी चांगली तयारी केली आहे.

\- ललीत मोहन सोनी, बनारस हिंदू विश्व विद्यालय

वेस्टर्न ग्रुप साँग प्रकारात सहभागी झालो आहे. राष्ट्रीय स्पर्धा असल्याने स्पर्धेचा स्तर खूप उंच असल्याचे दिसून येते. सर्वांनी तयारी चांगली केली आहे. प्रत्येकासमोर तगडे आव्हान आहे. स्पर्धा सर्वांनाच काठिण्यपातळीवर घेऊन गेली.

\- प्रागंण बोरा, तेजपूर विद्यापीठ, आसाम

लोककलांना अशा महोत्सवातून संधी मिळते. आदिवासी संस्कृतीमध्ये संगीताला विशेष प्राधान्य देतात. म्हणून त्यांची संगीत वाद्ये, सूर, ताल, लय यांचा सुंदर मिलाफ साधणारी आहेत. त्याचा छटा महोत्सवात दिसतात.

\- डॉ. प्राऊल देसाई, वीरमदन युनिर्व्हसिटी, सुरत

अमित गाडे



# सूर, लय, तालाचा हिंदोळा

## समूहगीत, लोकगीतांची बहार

शिवोत्सव

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

सूरवाद्यांचा मनमोहक झंकार, समूहगीतांचा सुरेल आविष्कार, लोकगीतांच्या चालींवर ठेका धरायला लावणारी स्पर्धा, अभिनय आणि नृत्याचा अनोखा मिलाफ घडविणाऱ्या एकांकिकांचे सादरीकरण करत तरुणाईने युवा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी बहार आणली. गायन, वादन, अभिनयामुळे शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस जणू सूर, लय आणि तालाच्या हिंदोळ्यावर झुलत राहिला.

दिवसभरात विद्यार्थ्यांनी 'एकसे बढकर एक' परफॉर्मन्स सादर करत राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेची तयारी दाखवून दिली. जादूई कुंचल्यातून पोस्टर मेकिंगची कला सादर करत मानव्यशास्त्र विभागातील सभागृहात प्रेक्षकांना अचंबित केले. भाषाभवन येथील वि. स. खांडेकर सभागृहात एकांकिका स्पर्धेत चंदीगढ युनिव्हर्सिटी, मोहालीच्या विद्यार्थ्यांनी चार्ली चॅपलिनच्या जीवनावर अधारित सादर केलेली एकांकिका प्रेक्षकांची मने जिंकून गेली. लोककला केंद्रात झालेल्या वेस्टर्न सोलो गायन आणि वेस्टर्न ग्रुप गायनाने 'शिवोत्सवा'ची उंची अधिक वाढवली. दयालबाग एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या (आग्रा) विद्यार्थ्याने सादर केलेले बासरीवादन रसिकांच्या मनाला भुरळ पाडून गेले. ताल-सुरांची ही गट्टी सायंकाळपर्यंत सुरू होती. सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांनी केलेली वेशभूषा आणि तितक्याच ताकदीने केलेल्या सादरीकरणामुळे युवकांच्या जल्लोषाला अक्षरशः उधाण आले होते. सकाळी साडेनऊ पासून सुरू झालेला उत्साह रात्रीपर्यंत कायम होता.

### एकांकिकांतून सामाजिक संदेश

वि. स. खांडेकर भाषाभवन येथे सादर झालेल्या एकांकिकांच्या माध्यमातून सामाजिक जाणीवांचे संदेश दिला. वैश्यांच्या जीवन चरित्रांचे दर्शन देणाऱ्या एकांकिकेचे सादरीकरण करून नवी दिल्लीच्या जामिया मिल्लिया विद्यापीठाने सामाजिक स्थितीवर भाष्य केले. अभिनयाला मिळालेली संगीताच्या सार्त साथीमुळे एकांकिका अधिक खुलत गेली. तर राष्ट्रसंत गाडगेबाबा विद्यापीठाने सध्याच्या लोकशाहीवर भाष्य करणारी 'भारत आणि मी' एकांकिका सादर केली. जबलपूर येथील राणी दुर्गावती विद्यापीठाने 'अंधारयुग' ही महाभारतावरील एकांकिका सादर केली. स्वरुप चौधरी याने अश्वत्थामाची भूमिका प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवून गेली. चंदीगढ विद्यापीठ मोहालीच्या विद्यार्थ्यांनी चार्ली चॅपलीनच्या जीवनावर एकांकिकेने उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आणले. दुसरे महायुद्ध आणि त्याला अभिनयाच्या माध्यमातून चार्ली यांनी हिटरला केलेला विरोध अनोखा अभिनय विद्यार्थ्यांनी सादर केला. सायंकाळच्या सत्रात मुंबई विद्यापीठ, हरियाणाच्या चौधरी रणवीरसिंह विद्यालय, मुंबईचे एसएनडीटी आणि सोलापूर विद्यापीठांनी आपल्या एकांकिका सादर करत सामाजिक जाणिवा अधोरेखित केल्या.

### उशीरा लोकसंगीताचा ठेका

युवा महोत्सवाचे सर्व मुख्य कार्यक्रम लोककला केंद्रात सुरू आहेत. एकापेक्षा एक सरस होणाऱ्या कार्यक्रमासाठी केंद्राची आकर्षक सजावट केली आहे. मात्र सकाळी दहा वाजता सुरू होणारे कार्यक्रम दुपारी एक पर्यंत सुरू झाले नव्हते. त्यामुळे सहभागी संघांना वारंवार कार्यक्रमस्थळी येण्याचे आवाहन केले जात होते. वेस्टर्न सोला गायन प्रकारात चंदीगढ विद्यापीठ, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती व बंगळुरू विद्यापीठाच्या स्पर्धकांनी कला सादर केली. तर वेस्टर्न ग्रुप गायन स्पर्धेत पंजाबच्या लवली युनिव्हर्सिटी आणि केरळच्या शंकराचार्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी कला सादर केली. त्यामुळे सायंकाळी उशीरा लोकसंगीताला सुरुवात झाली. अमृतसर येथील गुरुनानकदेव विद्यापीठ, आसामच्या गुवाहाटी विद्यापीठ, बंगळुरू युनिव्हर्सिटी, आसामची तेजपूर युनिव्हर्सिटी आणि गुजरातच्या अहमदाबाद विद्यापीठाच्या संघांनी लोकसंगीत स्पर्धेत सहभाग घेतला.



वि. स. खांडेकर भाषा भवन येथे चार्ली चॅपलिनच्या जीवनावर एकांकिका सादर करताना चंदीगड विद्यापीठाचे विद्यार्थी.



युवा महोत्सवामध्ये लोकसंगीत प्रकारात कला सादर करण्यापूर्वी आकर्षक वेशभुषा करुन स्पर्धेच्या तयारीत असलेला आंध्रप्रदेश येथील कृष्णा विद्यापीठाचा संघ.



### तानसेन झाले तृप्त

महोत्सवाच्या सकाळच्या सत्रात संगीत व नाट्यशास्त्र विभागात क्लासिकल इन्स्ट्रुमेंटल सोलो (नॉन-पर्क्युशन) व क्लासिकल इन्स्ट्रुमेंटल सोलो (पर्क्युशन) दोन प्रकारात झाली. सकाळच्या अल्हादायक वातावरणात राग देस, जोग आणि टोडी शास्त्रीय संगीतातील प्रेक्षकांना मोहनी घातली. मंजुळ सुराच्या बासरी वादनाने प्रेक्षक अक्षरशः मान डोलवत होते. गुजरात विद्यापीठाच्या (अहमदाबाद) स्पर्धकांनी सादर केलेल्या सांरगी वादनाने तानसेन तृप्त झाले. तर बनारस विश्व हिंदू विद्यालय व केरळ विद्यापीठ केरने सादर केलेल्या व्हायोलियन वादन केले. पश्चिम बंगाल येथील शांतीनिकेतन विद्यापीठाच्या इसराज वादनाने युवकांनाही डोलायला लावले. दुपारच्या सत्रात तबला, पखवाज आणि मृदुंगांची जुगलबंदी पाहला मिळाली.

### पोस्टर मेकिंगमधून सामाजिक संदेश

मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात कुंचल्याचा कलाविष्कार आणि उत्कृष्ट रंगसंगती पाहण्याची पर्वणी युवकांना लाभली. स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरण, स्वच्छतेचा संदेश देत निसर्गाशी मैत्री करण्याचे आवाहनही केले जात होते. पोस्टर मेकिंग स्पर्धेत १४ विद्यापीठाचे स्पर्धक सहभागी झाले होते. केवळ पर्यावरण, प्रदूषण यावरच भर न देता निरोगी आरोग्याची कानमंत्रही कुंचल्याच्या माध्यमातून दिला जात होता. दुपारनंतर येथे कोलाजची अप्रतिम कलाकृती पाहताना भान हरपून गेले. टाकाऊपासून टिकाऊ हा मंत्र यातून दिला. रंगीबेरंगी कागदाच्या सहाय्याने केलेली कलाकृती सर्वांचेच लक्ष वेधून घेत होती.

### आज महोत्सवात

- भाषा भवन : सकाळी ९.३० वा. एकांकिका,
- सायंकाळी : ६ वा. एमआएमइ
- वनस्पतीशास्त्र विभाग : सकाळी ९.३० वा. वादविवाद स्पर्धा,
- दुपारी १ वा.: प्रश्नमंजुषा अंतिम फेरी
- मानव्यशास्त्र विभाग : सकाळी ९.३० वा. त्रिमितीय कलाकृती,
- दुपारी १ वा. कार्टुनिंग
- लोककला केंद्र :
- सकाळी १० वा.
- सूगम गायन
- दुपारी २ वा. भारतीय ग्रुप गायन
- संगीत व नाट्यशास्त्र विभाग :
- दुपारी ४ वा. क्ले मॉडेलिंग,
- शास्त्रीय संगीत



## दृष्टिक्षेपात

# क्रीडा अधिविभागप्रमुख गायकवाड यांना पीएच.डी.



गायकवाड

कोल्हापूर, ११ : शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा अधिविभागप्रमुख पी. टी. गायकवाड यांना नुकतीच शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली. 'पदवी स्तरावर शारीरिक शिक्षण हा विषय ऐच्छिक असणाऱ्या महाविद्यालयांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर त्यांनी विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. पुणे येथील डॉ. व्यंकटेश वांगवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले. श्री. गायकवाड शिवाजी विद्यापीठात २००५ पासून क्रीडा अॅथलेटिक्स प्रशिक्षक म्हणून रुजू झाले. २०१० पासून क्रीडा अधिविभागप्रमुख म्हणून ते काम पाहत आहेत. तत्पूर्वी, त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय येथून शारीरिक शिक्षण संचालक म्हणून कारकिर्दीस सुरवात केली. त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# कलाविष्कारांची उधळण...









(छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सेव्ह एन्व्हायर्नमेंट, सेव्ह वर्ल्ड.. एक कदम स्वच्छता की ओर.. नक्षलवाद, वेश्याव्यवसाय, पर्यावरण रक्षण, पुराणकथा महाभारतसारख्या सामाजिक विषयांसह वेस्टर्न सोलो, शास्त्रीय सूरवाद्य, तालवाद्यांच्या संगीतमय सादरीकरणातून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात देशभरातील युवकांनी कलाविष्कारांची उधळण केली. एकांकिका, कोलाज, पोस्टर्स मेकिंग, शास्त्रीय सूरवाद्य, प्रश्नमंजुषा, वादविवाद स्पर्धेत एकाहून एक सरस, दमदार सादरीकरण करून महोत्सवात रंगत आणली.

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

### विविध स्पर्धांमध्ये कलाकारांचे दमदार सादरीकरण



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवास प्रारंभ झाला आहे. शनिवारी (दि. ११) सकाळी दहा वाजल्यापासून विविध स्पर्धांना सुरुवात झाली. विद्यापीठातील लोककला केंद्रात झालेल्या वेस्टर्न सोलो स्पर्धेत १५ संघांनी सादरीकरण केले. विद्यासागर युनिव्हर्सिटी मिदनापूर, प. बंगालच्या विद्यार्थ्यांनी 'कम ऑन', सरदार पटेल युनिव्हर्सिटी आनंद, गुजरातच्या संघाने 'आय डोन्ट नो व्हॉट टू डू', राणी दुर्गावती युनिव्हर्सिटीच्या कलाकारांनी 'न्यू डॉन, न्यू डे, न्यू लाईफ' असे वेस्टर्न सोलो सादर केले.

वि. स. खांडेकर भाषाभवन येथे एकांकिका स्पर्धा झाल्या. जामिया मिलिया इस्लामिया युनिव्हर्सिटी नवी दिल्लीच्या विद्यार्थ्यांनी वेश्या व्यवसायाचे विदारक चित्र मांडले. राणी दुर्गावती युनिव्हर्सिटी, जबलपूरच्या विद्यार्थ्यांनी धर्मवीर भारती रचित अंधायुगावर आधारित 'पशू का अंत' एकांकिका सादर केली. यात महाभारताच्या युद्धातील महारथी अश्वत्थामाच्या मनाची अवस्था व प्रतिहिंसा दाखविण्यात आली. चौधरी रणबीरसिंह युनिव्हर्सिटी, जींद हरियाणाच्या संघाने 'नीर निरुपण' एकांकिकेच्या माध्यमातून पृथ्वीवरील पाणी वाचविले तरच सृष्टी वाचेल, असा संदेश दिला.

मानव्यशास्त्र विभागात 'पर्यावरण' या विषयावर पोस्टर मेकिंग स्पर्धा झाली. रांची विश्वविद्यालय, झारखंडने 'स्वच्छ वातावरण, स्वच्छ हम', जाधवपूर युनिव्हर्सिटी कलकत्ताच्या विद्यार्थ्यांनी 'ब्रीथ हेल्दी, स्टे हॅपी', मुंबई विद्यापीठाने मानव व वातावरणाचे संतुलन राखणारा 'तराजू', आणि जी.एन.डी.ए. विद्यापीठ अमृतसरच्या पान २ वर





### वन्स मोअर...

वेस्टर्न सोलो स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची पाश्चात्य गीते सादर केली. गिटार, बासरी, व्हायोलिन वाद्यांच्या संगीताने सभागृहातील उपस्थितांना भुरळ घातली. प्रत्येक संघ वेगळेपण दाखविण्याचा प्रयत्न करीत होता. युवा कलाकारांच्या सूरमयी संगीत अविष्कारास टाळ्या, शिट्ट्यांची दाद मिळाली.



### रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

संत गाडगे बाबा विद्यापीठ (अमरावती) च्या कलाकारांनी 'चित्रविचित्र' या एकांकिकेतून शाहीर सचिन माळी, शीतल साठे यांना नक्षलवादी ठरवून त्यांच्यावर झालेल्या अन्यायास वाचा फोडली. वास्तववादी चित्रण उत्कृष्ट सादरीकरणातून उभे केले. यास रसिकांनी टाळ्यांची दाद दिली.

### थँक यू 'पुढारी'...

कोल्हापूर स्वच्छ असून लोक सहकार्य करणारे आहेत. कोल्हापूरकडून चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. शोभायात्रेतील पारंपरिक संस्कृती दर्शनास दै. 'पुढारी'ने ठळक प्रसिद्धी दिल्याबद्दल जालंधर येथील आय. के. गुजराल विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी थँक यू दै. 'पुढारी'...या शब्दात आभार व्यक्त कले.

त्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू होणार आहे.

## कलाविष्कारांची उधळण

**(पान १ वरुन)** विद्यार्थ्यांनि 'सेव्ह पर्यावरण' विषयावरील पोस्टरच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाची हाक दिली. दयालबाग एज्युकेशन इन्स्टिट्यूट आग्राने 'बासरी', गुजरात युनिव्हर्सिटी, अहमदाबादने 'सारंगी', बनारस विद्यापीठाने 'व्हाईलिन', कर्नाटक युनिव्हर्सिटी धारवाडने 'सनई', पश्चिम बंगालच्या विश्व भारती शांतिनिकेतन विद्यापीठ 'इसराज' हे वाद्य वाजविले. त्यानंतर दुपारच्या तालवाद्य स्पर्धेत कलाकारांनी तबला, पखवाज, मृदंग या वाद्याद्वारे सादरीकरण केले. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी सभागृहात 'स्वच्छ भारत' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा झाली. यात देवी आहिल्या युनिव्हर्सिटी, मध्यप्रदेश, लव्हली प्रोफेशन युनिव्हर्सिटी पंजाब, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, महात्मा गांधी युनिव्हर्सिटी केरळ, गुरुनानक युनिव्हर्सिटी अमृतसर आदी संघ सहभागी झाले होते.'भारताच्या आर्थिक समृद्धीसाठी विमुद्रीकरण एकमेव उपाय' या विषयावर वादविवाद स्पर्धा झाली. यात १५ संघ सहभागी झाले होते. प्रश्नमंजुषा स्पर्धे तही विद्यार्थी कलाकारांनी सहभाग घेत समर्पक उत्तरे दिली.




## शिवोत्सव...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवोत्सवामध्ये दुसऱ्या दिवशी लोककला सादर करताना आसामचे विद्यार्थी. (वृत्त पान ३ वर) (छाया : एस. अली)






**कोल्हापूर :** शिवोत्सवात आपली कला सादर करताना विविध विद्यापीठांचे विद्यार्थी-विद्यार्थीनी. (छाया : एस अली)

# भारतीय-पाश्चात्त्य सुरांनी निनादले विद्यापीठ

## तरुणाईच्या आविष्काराने परिसरात चैतन्य

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या राष्ट्रीय युवामहोत्सव 'शिवोत्सव २०१७'मध्ये महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी सायंकाळी लोककला ऑर्केस्ट्रा पार पडला. सहभागी संघांनी आपापल्या प्रांतांतील लोककला सादर केल्या. गर्दीने तुडुंब भरलेल्या सभागृहातील तरुणाईने लोकवाद्यांच्या तालावर ठेका धरला.

शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात अवघ्या देशभरातील संस्कृतीचे दर्शन घडत होते. पारंपरिक वेशभूषा करीत स्पर्धक लोककला केंद्रात दाखल होत होते. राजस्थानी पंजाबी, केरळ अश पारंपरिक वेशात दाखल झालेले स्पर्धक उपस्थितांसह परिसरातील लोकांचे लक्ष वेधून घेत होते. लोककला सादर करताना वापरण्यात आलेल्या चर्मवाद्य व तंतुवाद्यांनी महोत्सवात लय निर्माण केली, तर पारंपरिक

**SHIVOTSAV-2017**

वेशभूषांनी महोत्सवात रंग भरला.

यावेळी गुरू नानकदेव विद्यापीठ अमृतसर, महाराजा कृष्णकुमारजी विद्यापीठ भावनगर, गुवाहाटी विद्यापीठ आसाम, बेंगलोर युनिव्हर्सिटी, विद्यासागर युनिव्हर्सिटी पश्चिम बंगाल, गुजरात युनिव्हर्सिटी गुजरात, संत गाडगेबाबा अमरावती युनिव्हर्सिटी, तेजपूर युनिव्हर्सिटी आसाम, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, इंदिरा कला संगीत युनिव्हर्सिटी छत्तीसगढ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर युनिव्हर्सिटी, कृष्णा युनिव्हर्सिटी आंध्र प्रदेश, लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाब, कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटी, हरियाणा या संघांनी आपापल्या प्रांतातील लोककला सादर केली. या लोककलांचा बाज हा पारंपरिक असा होता, तर या लोकवाद्यांतून आलेल्या तालावर तरुणाईने अक्षरशः ठेका धरला.

# शिवोत्सवात देशोदेशीचे कलाविष्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** रंगीबेरंगी पारंपरिक पेहराव, त्यामधून प्रतित होणारी प्रांताप्रांतांची संस्कृती, संस्कृती व इतिहासाचे दर्शन घडवत देश-विदेशातील कलांचे करण्यात आलेले सादरीकरण, अशा वातावरणात शिवाजी विद्यापीठात '३२ वा राष्ट्रीय युवामहोत्सव' अर्थात 'शिवोत्सव २०१७'चा दुसरा दिवस पार पडला. अगदी अस्सल पारंपरिक कलांबरोबरच पाश्चिमात्य संगीताचा ठेका दिवसभरात रसिकांना अनुभवता आला.



**कोल्हापूर : महोत्सवात वेगळ्या प्रकारची नृत्यकला सादर करताना विद्यार्थिनी.** (छाया : एस. अली)

शुक्रवारपासून शिवाजी विद्यापीठात ३२ वा राष्ट्रीय युवामहोत्सव सुरू झाला आहे. आठ वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठला महोत्सवाचे यजमानपद मिळाले आहे. त्यानुसार महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दहा कला प्रकारांचा आस्वाद रसिकांना घेता आला. लोककला केंद्रामध्ये सकाळी १० वाजता पाश्चिमात्य वैयक्तिक गीत, तर दुपारी १ वाजता पाश्चिमात्य सामूहिक गीतांच्या स्पर्धा पार पडल्या. या दोन्ही कार्यक्रमांनी उपस्थितांची मने तर जिंकलीच, तर उपस्थितांना आपल्याबरोबरच गुणगुणायला व ताल धरायला लावले. भाषा भवन येथील सभागृहात सकाळी १० वाजता एकांकिका स्पर्धा पार पडल्या. दुःखावर फुंकर घालीत साऱ्या मानव जातीला हास्याचं देणं देऊन जाणाऱ्या चार्ली चॅप्लीन याच्यासारख्या भूमिकांनी रसिकांना खळखळून हसविलेच, त्याचबरोबर अश्वत्थाम्याने नाट्यरसिकांना विचार करण्यास प्रवृत्त केले. वनस्पतीशास्त्र विभागातील निलांबरी सभागृहात सकाळी साडेनऊ वाजता प्रश्नमंजूषा घेण्यात आली. प्रश्नमंजूषेच्या माध्यमातून देशभरातील तरुणाईने आपले बुद्धिमत्तेची ▶▶ पान २ वर

# शिवोत्सवात देशोदेशीचे कलाविष्कार

(पान १ वरून) चमक परीक्षकांबरोबरच उपस्थितांना दाखवून दिली, तर दुपारी १ वाजता स्वच्छ भारत या विषयावर वक्तृत्व स्पर्धेतून विचार मांडले. मानव्यशास्त्र विभागातील सभागृहात सकाळी साडेनऊ वाजता पोस्टर मेकिंग, तर दुपारी १ वाजता कोलाजची स्पर्धा पार पडली. संगीतशास्त्र विभागात सकाळी शास्त्रीय सूर वाद्यांच्या स्पर्धा पार पडल्या, तर दुपारी २ वाजता ताल वाद्यांच्या स्पर्धा पार पडल्या. सूर-तालांच्या लयबद्ध सादरीकरणामध्ये भाषेची सारी बंधने येथे गळून पडली. दिवसभरातील या कार्यक्रमांना स्थानिक विद्यार्थ्यांचीही मोठी उपस्थिती होती. जिल्हाभरातील महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसह विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली व सातारा जिल्ह्यातील तरुणाईनेही महोत्सव पाहण्यासाठी गर्दी केली होती.

●● पान १ वरून ●●

## लोकअदालतीत हजारो खटले निकाली

केली होती. कोल्हापुरात न्याय संकुल इमारतीमध्ये शनिवारी सकाळी ११ वाजल्यापासून लोकअदालतीचे कामकाज सुरू झाले. सहा पॅनेल तयार केले होते. प्रत्येक पॅनेलमध्ये सहा प्रतिनिधींचा समावेश होता. वादी-प्रतिवादींना समोर बोलावून त्यांच्यात समझोता केला जात होता. काही मुद्द्यांवर अडवल्यानंतर त्यांना भविष्यात होणाऱ्या त्रासाची कल्पना देऊन तोडगा काढला जात होता. आई-वडिलांच्या मिळकतीमध्ये वाटणी मागणीसाठी एका मुलीने न्यायालयात दावा दाखल केला होता. त्यामुळे या खटल्यावर दहा मिनिटात निकाल झाला. त्यासाठी ९० वर्षांची वृद्धा अनुसया शंकर नाळे यांना व्हीलचेअरवरून न्यायालयात आणले होते. येथे केसचा निकाल लागल्यामुळे नाळे यांनी समाधान व्यक्त केले. अशा प्रकारे झटपट निकाल लागत असल्याने शासनाचे त्यांनी आभार मानले. शाहूवाडी तालुक्यातील लोहारवाडी येथे राहणारी राणी मधुकर लोहार व मधुकर लोहार यांच्यात संशयावरून वाद झाला. राणी यांनी न्यायालयात खटला दाखल केला होता. ॲड. अनिता पंडितराव यांनी त्यांच्यात तोडगा काढण्यासाठी लोकअदालतीमध्ये आणले. १४ ते १५ वर्षांची त्यांना मुले आहेत. त्यामुळे त्यांच्यातील वाद सामंजस्याने मिटवण्यात आला. दोघेही आनंदाने न्यायालयातून निघून गेले. विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेशचंद्र मोरे यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

## बेळगावात अटक केलेल्या तरुणाच्या सुटकेची मागणी

सोडून द्यावे; अन्यथा आम्ही आंदोलन सुरू केल्यास परिस्थिती बिघडेल व त्याला बेळगाव प्रशासनास जबाबदार धरले जाईल. गृह पोलीस उपअधीक्षक सतीश माने यांनी हे निवेदन स्वीकारले. यावेळी सकल मराठा समाज संघटनेचे वसंतराव मुळीक, संभाजी जगदाळे, शंकरराव शेळके, महादेव पाटील, बाबूराव कदम, जयश्री पोवार, दिगंबर साळोखे, मानसिंग जाधव, विजय जाधव, आदित्य उलपे, महेश खामकर, लहू शिंदे, केदार गायकवाड, मच्छिंद्र पाटील, उदय जगताप, श्रीधर गाडगीळ, संजय कोटकर, रवींद्र कांबळे, केतन बावडेकर, ओंकार जगताप, कमलाकर जगदाळे, संदीप माने आदी हजर होते.

# विद्यापीठात शिवमहोत्सवाचा उत्साह

## चार्ली चॅप्लीन, अश्वत्थामाने नाट्यप्रेमींना जिंकले



कोल्हापूर : भाषा भवन येथे एकांकिका नाट्यप्रकारात चंदीगड विद्यापीठाने सादर केलेले चार्ली चॅप्लीनच्या जीवनावरील नाटक व त्यातील चार्लीची भूमिका साकारणारा कलाकार.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

संपूर्ण जगाच्या विनोदाचा विषय बनलेला इंग्लिश नट चार्ली चॅप्लीन, महाभारतात कमनशिबी ठरलेला द्रोणाचार्य पुत्र अश्वत्थामा यासारख्या व्यक्तिरेखांनी नाट्यरसिकांची मने जिंकली, तर उत्तम अभिनयाला प्रेक्षकांकडून टाळ्या व शिट्ट्यांची दाद मिळत होती. निमित्त होते आयोजित एकांकिका स्पर्धेचे.

शिवाजी विद्यापीठात आयोजित युवामहोत्सवात शनिवारी भाषा भवन येथे वन ॲक्ट प्ले (एकांकिका नाट्यप्रयोग) स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये देशभरातील १५ पेक्षा जास्त विद्यापीठ संघांनी सहभाग नोंदवला.

तीस मिनिटांचा कालावधी असलेल्या या एकांकिका स्पर्धेत देशातील पाणीप्रश्नापासून ते सामाजिक विषयांवरील नाट्यप्रयोग अनेक विद्यापीठांनी सादर केले. स्पर्धेच्या सुरुवातीलाच दिल्ली येथील जामिया-मिलिया विद्यापीठाने वारांगणांवर बेतलेले नाटक सादर केले, तर संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावतीच्या संघाने 'भारत आणि मी' या देशप्रेमावर आधारित नाटकाचे सादरीकरण केले. जबलपूर येथील राणी दुर्गावती युनिव्हर्सिटीने अंधायुग महाभारत हे ऐतिहासिक नाटक सादर करून प्रेक्षकांना पुन्हा महाभारत काळामध्ये नेले. या नाटकातील अश्वत्थामाची भूमिका अत्यंत सरस ठरली. महाभारतातील युद्धात अश्वत्थामा कसा कमनशिबी ठरला हे या नाटकातून सादर करण्यात आले. चंदीगड विद्यापीठाने जगप्रसिद्ध विनोदी कलाकार चार्ली चॅप्लीन याचा जीवनपटच नाटकातून मांडला. त्यामध्ये त्याच्या गरिबीचा काळ, चार्लीची जिद्द, लोकांकडून विनोदी नट म्हणून होणारी हेटाळणी, त्याची श्रीमंती असे चार्लीच्या जीवनातील अनेक कंगोरे या नाटकातून दाखवण्यात आले. विनोदसम्राटाच्या नाटकाने अनेकांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

हरियाणाच्या चौधरी रणबीरसिंह विद्यापीठाने वाळवंटातील पाणीप्रश्न 'नीर निरूपण' या नाटकातून सादर केला. याव्यतिरिक्त एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई, सोलापूर विद्यापीठ यासह देशभरातील विद्यापीठांनी नाट्यप्रयोग सादर केले.

## ताल-सुरांचा सुंदर मिलाफ



**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारतीय संगीत वाद्यांचा सुंदर मिलाफ संगीतप्रेमींना शनिवारी अनुभवायला मिळला. युवामहोत्सवांतर्गत संगीतशास्त्र विभागात सुरू असलेल्या सूरवाद्य-तालवाद्य स्पर्धेत देशभरातील ३० पेक्षा जास्त विद्यापीठांच्या संघांनी विविध वाद्यवादन सादर करून आपल्या प्रांताची संगीत परंपरा दृढ केली.

संगीत विभागामध्ये सुरू असलेल्या या वाद्यवादन स्पर्धेत तालवाद्य व सूरवाद्य अशा दोन विभागात स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेच्या सुरुवातीलाच आग्रा येथील दयालबाग विद्यापीठाच्या संघाने बासरीवादन करून उपस्थितांवर मोहिनी घातली, तर गुजरात विद्यापीठ, अहमदाबादच्या सारंगी वादनाने रसिकांना डोलायला लावले. बनारस हिंदू विश्वविद्यालयाने व केरळ विद्यापीठाने व्हॉयोलीन वादन सादर करून संगीतप्रेमींना उत्तर व दक्षिण प्रांतातील संगीत परंपरेची ओळख करून दिली. याव्यतिरिक्त शांतिनिकेतन विद्यापीठाने पश्चिम बंगाल येथील अत्यंत अवघड असे इसराज वाद्य वाजवून रसिकांना मंत्रमुग्ध केले. दुपारच्या सत्रात तालवाद्य प्रकारात तबला, मृदंग, पखवाज, ढोलकी असे विविध वाद्यप्रकार सादर करण्यात आले. भारतातील प्रत्येक प्रांतातील संगीत परंपरा, वाद्यपरंपरा, वादनाची पद्धत संगीत विभागांतर्गत रसिकांना पाहता आली.

### संस्कृतीचे दर्शन



महोत्सवाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात येण्याची संधी मिळाली. इथला परिसर अतिशय नयनरम्य व भव्य असा आहे. युवामहोत्सवात विविध प्रांतांतील विद्यापीठांच्या संघांनी कला सादर केली. त्यामुळे प्रत्येक राज्यातील संस्कृती पाहता आली.

**- मिहिता,**
**क्रिष्णा युनिव्हर्सिटी, आंध्र प्रदेश**

### परिसर नयनरम्य



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाबद्दल केवळ ऐकून होतो; परंतु महोत्सवाच्या निमित्ताने प्रत्यक्षात विद्यापीठ परिसर पाहता आला. विद्यापीठ परिसर अत्यंत भव्य व निसर्गसंपन्न असा आहे. पाण्याचा तलाव, वनस्पती, झाडे यामुळे हा परिसर नयनरम्य दिसतो. देशभरातील मोठ्या विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाची गणना होऊ शकते.

**- अमरदीप सिंह,**
**लवली युनिव्हर्सिटी, पंजाब**



कोल्हापूर : शिवोत्सवामध्ये सामूहिक पाश्चिमात्य गीत सादर करताना चंदीगड विद्यापीठाच्या विद्यार्थिनी.

## पाश्चिमात्य सुरांचीही मोहिनी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवोत्सव २०१७ मध्ये शनिवारी सकाळी वैयक्तिक पाश्चिमात्य गाण्यांच्या, तर दुपारी सामूहिक पाश्चिमात्य गाण्यांच्या स्पर्धा पार पडल्या. वैयक्तिक स्पर्धांमध्ये १४, तर सामूहिक स्पर्धांमध्ये १५ संघांनी भाग घेतला. जगभरातील गाण्यांचे आपल्या विशिष्ट शैलीत देशभरातील तरुणाईने सादरीकरण केले, तर बहुसंख्येने सभागृहात उपस्थित असलेल्या स्थानिक श्रोत्यांनी दाद दिली. आपल्या सादरीकरणाने पाश्चिमात्य सुरांच्या साथीने स्पर्धकांनी करवीरकरांवर मोहिनी घातली.

आपल्या रांगडेपणाबद्दल प्रसिद्ध असणाऱ्या आणि पोवाडे, लावणी व मराठी गाण्यांना उत्स्फूर्त अशी दाद देणाऱ्या करवीरकरांनी पाश्चिमात्य गाण्यांनाही उत्स्फूर्त अशी दाद दिली. ही दाद टाळ्यांच्या आणि शिट्ट्यांच्या स्वरूपात तर होतीच, त्याचबरोबर काहींनी या गाण्यांबरोबरच ठेका धरला. टाळ्या, शिट्ट्यांबरोबरच अनेकांनी सहभागृहामध्येच उभे राहून नाचण्यास सुरुवात केली. सरदार पटेल विद्यापीठ आनंद गुजरातच्या कलाकारांनी 'आय डोन्ट नो व्हॉट टू डू' आणि बॅन जॉनी ही दोन गाणी सादर केली, तर राणी दुर्गावती विद्यापीठ जबलपूरच्या स्पर्धकांनी 'न्यू डाऊन, न्यू डे, न्यू लाईफ हे गाणे सादर केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर येथील कलाकारांनी हाय नोटमध्ये 'वी डोन्ट टॉक मोर एनी मोअर' हे गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

**विविध गीतांचे स्पर्धकांकडून सादरीकरण**

त्याचबरोबर छत्रपती शाहू महाराज विद्यापीठ कानपूर, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, विद्यासागर विद्यापीठ पश्चिम बंगाल, बनारस हिंदू विश्वविद्यालय वाराणसी, सरदार पटेल विद्यापीठ आनंद गुजरात, राणी दुर्गावती विद्यापीठ जबलपूर, मुंबई विद्यापीठ, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, महात्मा गांधी विद्यापीठ केरळा, अलीगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी, गुरू नानक युनिव्हर्सिटी अमृतसरच्या विद्यार्थ्यांनी वैयक्तिक गीते सादर केली. प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त अशा दादींमुळे स्पर्धक तर भारावून गेलेच, तर श्रोतेही ही गाणी गुणगुणत सभागृहाबाहेर पडले.



कोल्हापूर : शिवमहोत्सवात सामील झालेल्या विविध विद्यापीठातील विद्यार्थी आकर्षक पेंटिंग काढण्यात मग्न होते. कोलाज् कलेतून चित्र साकारताना विद्यार्थी. (सर्व छाया : एस. अली)

# आदिवासी लोकवाद्ये सूरमयी वाद्यांचा नजराणा

## शिवोत्सवाला नावीन्याच्या छटा : आदिवासी वाद्याला संशोधकीय जोड



तडाफा, पिपुडी आणि संबाला.

**शिवाजी यादव** : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ११ : सध्या इलेक्ट्रॉनिक्स तंत्राच्या वाद्यांची चलती आहे. त्यातील ध्वनिलहरी नक्कीच ताल धरायला लावतात. तसा ताल-सूर भारतीय लोकसंगीतातील देशी बनावटीच्या वाद्यातून उमटतो. त्यातील ध्वनी लहरी मनाला प्रसन्नतेचा साज देतात. त्यासोबत मनातील भीती दूर करून जोश निर्माण करतात. अशा वाद्यातील सूर, ताल, लय एखाद्या संकटातील ताण, ओझे हलके करण्याची किमया साधते. अशी वाद्ये आदिवासी संस्कृतीची शान बनली आहेत.**

**पान २ वर »**

**तडाफा** : हे प्रमुख सूरवाद्य आहे. मराठी पुंगी किंवा गारूड याच्याशी साधर्म्य साधणारे तडाफा हे वाद्य आहे. काळीपट्टीच्या चारच्यावरील सूर आहे. त्याचा पेहराव आदिवासी संस्कृतीचा आहे. वाळलेल्या फुलांचे बोंड, तुरे व रंगीबेरंगी दोरे या वाद्याच्या डोईवर डोलतात. त्याखाली दोन वाळलेल्या दुधी भोपळ्याचे आकार आहेत. त्याला मध्यभागी बांबूच्या पोकळ कांड्या जोडल्या आहेत. प्रत्येक कांड्याला तीन- चार छिद्रे आहेत. भोपळ्याच्या पोकळीच्या तोंडावर पोकळ बांबूची कांडी आहे. त्याच्या टोकावर फुंकर मारल्यानंतर हवा भोपळ्याच्या दोन्ही आकारात घुमते. तिथे ध्वनितरंग निर्माण होऊन एका लयीत बांबूच्या पोकळीतील छिद्रातून बाहेर पडतात तेव्हा सूरमयी व काहीशा खर्जातील ध्वनिलहरी उमटतात. सुरेल असे तडाफा हे वाद्य आहे.

**संबाला** : मराठी संबळ या वाद्याशी मिळते जुळते असे संबाल हे ताल वाद्य आहे. संबळ व संबाला यात तुलनात्मक फरक आहे. संबालात दोन डग्गे आहेत. एकावर चमडे, तर दुसऱ्यावर पॉलिव्हिनेल (प्लास्टिक) पेपरसारखे आवरण आहे. त्यावर गोलाकार काटीने आघात केल्यास खणखणीत, दमदार ध्वनी उमटतात. हे वाद्य रणवाद्य म्हणून परिचित आहे. एखाद्या कठीण प्रसंगाला सामोरे जाताना मनातील भीती दूर होऊन जोश निर्माण करणारा काहीसा कर्कश आवाज करणारे कडकडाट करणारे वाद्य आहे; पण संबळ वाद्याच्या तुलनेत संबालाचा आवाज काहीसा खालच्या पट्टीत आहे.

**पिपुडी** : हे वाद्य महाराष्ट्रातील यात्रा-जत्रांमध्ये वाजविल्या जाणाऱ्या पिपाणीच्या भगिनी म्हणजे पिपुडी. वेताच्या पोकळ कांड्या आहेत. त्याच्या शेवटी ध्वनी घुमण्यासाठी गोलाकार चंद्रकोर आकार हा विशिष्ट झाडाच्या साली किंवा पानांपासून बनविलेला आहे; तर सुरवातीच्या टोकाला झाडांच्या साली किंवा पानांपासून बनविलेले चपटे तोंड आहे. त्यावर फुंकर मारल्यानंतर सूर तयार होतात.

# भन्नाट चार्ली; दिलखेचक अश्वत्थामा

## शिवोत्सवाचा दुसरा दिवस ठरला संस्मरणीय : लोककला केंद्रही झाले मंत्रमुग्ध

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : चार्ली चॅप्लिनचा भन्नाट अभिनय, अश्वत्थाम्याचे दिलखेचक संवाद, कामवाल्या बायकांचे दुःख, पाणी वाचविण्याचा संदेश अन् विविध-विविध एकांकिकांतून केलेल्या समाजप्रबोधनाने शिवोत्सवाचा दुसरा दिवस संस्मरणीय ठरला. वेस्टर्न सोलो व वेस्टर्न समूह गायनातून पाश्चात्त्य सुराकटींच्या आनंदात लोककला केंद्रही मंत्रमुग्ध झाले. शिवाजी विद्यापीठातर्फे महोत्सवाचे आयोजन केले आहे.

चंदीगड विद्यापीठाची 'किंग ऑफ ट्रॅजेडी' विषयावरील एकांकिका उपस्थितांच्या काळजाला भिडली. विनोदाचा बादशहा चार्लीच्या जीवनावर आधारित एकांकिकेने तरुणाईच्या हृदयावर अधिराज्य गाजविले.



कोल्हापूर : चंदीगड विद्यापीठाच्या टाळ्यांची दाद घेणाऱ्या 'किंग ऑफ ट्रॅजेडी' एकांकिकेतील एक दृश्य.

अक्षय राजाचा चार्लीचा अभिनय टाळ्यांची दाद घेऊन गेला. शिवम शर्मा, रुची चौहान, समीर टाक, प्रथम दुबे, मनीषा, अंकित परिख, मानसी व मनी यांच्याही एकांकिकेत भूमिका होत्या. जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठाने 'पशू का अंत' एकांकिकेतून अश्वत्थाम्याच्या जीवनावर प्रकाश टाकला. स्वरूप चौधरीची अश्वत्थामाची भूमिका अफलातून ठरली. त्यास उपस्थितांची दाद मिळाली.

मुंबई विद्यापीठाने 'हुला धीर से हुला' विषयातून नवकंदी विषय हाताळला. शंतनू संगणेकर, तन्मय चव्हाण, वैष्णवी फाटक, अक्षय राणे, रोहन कोलेकर, ऋषीकेश देशमाने, मृणाली सावंत यांनी उत्तम अभिनयाने एकांकिका सजवली. रणवीरसिंग चौधरी विद्यापीठ नीर निरूपण एकांकिकेतून पाणी वाचवीचे महत्त्व स्पष्ट केले. एसएनडीटी विद्यापीठाने कामवाल्या बायकांचे दुःख मांडून स्त्रीचा जन्म केवळ दुःख भोगण्यासाठी झाला नसल्याचा संदेश दिला. त्यांच्या एकांकिकेला टाळ्यांचा कडकडाट मिळाला. सोलापूर विद्यापीठाने 'मजार' एकांकिकेतून पाकिस्तानातून आलेल्या हिंदू महिलेला मुस्लिम भारतीय सैनिकाने दिलेल्या सन्मानजनक वागणुकीची मांडणी केली.

वेस्टर्न सोलो प्रकारात चौदा विद्यापीठे सहभागी झाली होती. लोककला केंद्रात सकाळच्या सत्रात वेस्टर्न सोलो प्रकाराने उपस्थितांना थक्क केले. पाश्चात्त्य संगीताच्या ठेक्यावर गायकांचे सूर अनेकांच्या कानात घुमत राहिले. छत्रपती शाहू महाराज (कानपूर), सावित्रीबाई फुले (पुणे), विद्यासागर (मिदनापूर, पश्चिम बंगाल), कालिकत (केरळ), मंगळूर (कर्नाटक), बनारस हिंदू (उत्तर प्रदेश), सरदार पटेल (गुजरात), राणी दुर्गावती (जबलपूर), मुंबई (महाराष्ट्र), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (नागपूर), संत गाडगे बाबा (अमरावती), महात्मा गांधी (अलिगड), गुरू नानक (अमृतसर) विद्यापीठाने सोलो प्रकारात सहभाग झाली.

### साहित्याची रंगली चर्चा

**चंदीगड विद्यापीठाने किंग ऑफ ट्रॅजेडी विषयावरील एकांकिकेची विद्यापीठ वर्तुळात जाहिरात केली होती. सर्व कॅंटीनच्या परिसरात त्याचे फलक चिकटविले होते. विशेष म्हणजे एकांकिकेसाठी त्यांनी एक ट्रक साहित्य आणले होते. त्यात चार्लीच्या पुतळ्यांसह विविध लाकडी आकृत्यांचा समावेश होता. त्यांच्या एकांकिकेला टाळ्यांचा जोरदार प्रतिसाद तर मिळालाच, शिवाय त्यांनी वापरलेल्या साहित्याची चर्चा चांगलीच रंगली.**

### आज होणारे कार्यक्रम असे :

- ९ : ३०
- वादविवाद (नीलांबरी हॉल)
- इन्स्टॉलेशन (मानव्यशास्त्र सभागृह)
- १० : ००
- सुगम गायन - भारतीय (लोककला केंद्र)
- एकांकिका (भाषाभवन)
- १ : ००
- प्रश्नमंजूषा (नीलांबरी हॉल)
- व्यंगचित्रकला (मानव्यशास्त्र सभागृह)
- २ : ००
- समूहगीत - भारतीय (लोककला केंद्र)
- ४ : ००
- शास्त्रीय गायन (संगीत व नाट्यशास्त्र विभाग)
- क्ले मॉडेलिंग (संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग)
- ६ : ००
- मूकनाट्य (भाषाभवन)

# जीवनसंगीत सुनो...!

## पाश्चिमात्य संगीताचे जल्लोषी यूथ 'बीटस्'

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : संगीत कोणत्याही प्रकारचं असो, त्यात माणसाच्या जगण्याचा आविष्कारच ओसंडून भरलेला असतो... संगीत शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि एकूणच भारतीय असो किंवा पाश्चिमात्य, ते प्रत्येकाच्या हृदयाचा ठाव घेते...'संगीत है ये संगीत है-जीवनसंगीत सुनो' अशी साद घालत देशभरातून आलेल्या तरुणाईने आज पाश्चिमात्य संगीताची जणू अद्‌भुत श्रवणयात्राच घडवली.

शिवोत्सवाचा आजचा दिवस उजाडला तोच मुळी वेस्टर्न सोलो सादरीकरणाने. अर्थात पाश्चिमात्य सूर-तालांची गट्टी सकाळपासूनच जमली. या संगीतातील विविध प्रवाह उलगडू लागले आणि पाश्चिमात्य फोटो-संगीतावर यूथ बीटस्‌चा जल्लोष सुरू झाला. पाश्चिमात्य संगीत जसा आनंद देते, तसाच विरहही तितक्याच सुंदरपणे मांडते. त्याचवेळी विद्रोह आणि असंतोष प्रकट करतानाही तितकाच सळसळता आविष्कार घडवते. अलीकडच्या काळात तर पाश्चिमात्य संगीतानेही भारतीय संगीताला सामावून घेतले आहे. एकूणच हे सारे प्रवाह तरुणाई आपापल्या कलाविष्कारातून अफलातून सादर करत होती. त्यातही समूह गीतांतील सादरीकरण स्वरांकित करताना सूर व तालांचा सुरेख मिलाफ घडत होता. कधी हलकी फुंकर, कधी टाळ्यांचा कमी-अधिक वापर करून तर कधी पायांच्या हालचालीतून विविध आवाजांची अनुभूती देत हा सामूहिक आविष्कार सजत होता. तरुणाईच्या या प्रत्येक प्रयोगाला भरभरून दाद मिळत होती आणि टाळ्या-शिट्ट्यांची ही उत्स्फूर्त दाद घेत एकापाठोपाठ एक सरस आविष्कार सजत होता. लोककला केंद्रात सकाळी दहापासून सुरू झालेली ही पाश्चिमात्य संगीताची अनोखी मैफल सायंकाळी साडेपाचपर्यंत सुरू राहिली आणि मावळतीच्या सूर्याच्या साक्षीने पुढे मान्यांतच लोक वाद्यवृंदाच्या सादरीकरणाची आस लागली.




कोल्हापूर : लोककला केंद्रात शनिवारी पाश्चिमात्य समूहगीत सादर करताना चंदीगड विद्यापीठाच्या विद्यार्थिनी.

(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

### कोलाज अन् भारतीय संगीत

**एकीकडे पाश्चिमात्य संगीताची आनंदानुभूती लोककेंद्रात मिळत होती. त्याचवेळी संगीत व नाट्यशास्त्र विभागात भारतीय संगीताचे सोलो सादरीकरण सुरू होते आणि मानव्यशास्त्र विभागात 'कोलाज' कलाविष्कार घडत होता. एकूणच या साऱ्या कलाविष्कारात तरुणाईची 'क्रिएटिव्हिटी' पणाला लागली होती आणि तितकीच उत्स्फूर्त दाद प्रत्येक सादरीकरणाला मिळत होती.**

# भन्नाट चार्ली; दिलखेचक अश्वत्थामा

## शिवोत्सवाचा दुसरा दिवस ठरला संस्मरणीय : लोककला केंद्रही झाले मंत्रमुग्ध

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : चार्ली चॅप्लिनचा भन्नाट अभिनय, अश्वत्थाम्याचे दिलखेचक संवाद, कामवाल्या बायकांचे दुःख, पाणी बचतीचा संदेश अन् चित्र-विचित्र एकांकिकांतून केलेल्या समाजप्रबोधनाने शिवोत्सवाचा दुसरा दिवस संस्मरणीय ठरला. वेस्टर्न सोलो व वेस्टर्न समूह गायनातून पाश्चात्त्य सुरावटींच्या आनंदात लोककला केंद्रही मंत्रमुग्ध झाले. शिवाजी विद्यापीठातर्फे महोत्सवाचे आयोजन केले आहे.

चंदीगड विद्यापीठाची 'किंग ऑफ ट्रॅजेडी' विषयावरील एकांकिका उपस्थितांच्या काळजाला भिडली. विनोदाचा बादशहा चार्लीच्या जीवनावर आधारित एकांकिकेने तरुणाईच्या हृदयावर अधिराज्य गाजविले.



कोल्हापूर : चंदीगड विद्यापीठाच्या टाळ्यांची दाद घेणाऱ्या 'किंग ऑफ ट्रॅजेडी' एकांकिकेतील एक दृश्य.

अक्षय रावतचा चार्लीचा अभिनय टाळ्यांची दाद घेऊन गेला. शिवम शर्मा, रूबी चौहान, समीर टाक, प्रयास दुबे, मनीला, अंकित परिख, मानसी व सनी यांच्याही एकांकिकेत भूमिका होत्या. जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठाने 'पशू का अंत' एकांकिकेतून अश्वत्थामाच्या जीवनावर प्रकाश टाकला. स्वरूप चौधरीची अश्वत्थामाची भूमिका अफलातून ठरली. त्याला उपस्थितांची दाद मिळाली.

मुंबई विद्यापीठाने 'झुला धीर से झुला' विषयातून नसवंदी विषय हाताळला. शंतनू रांगणेकर, तन्मय चव्हाण, वैष्णवी फाटक, अक्षय राणे, रोहन कोतेकर, ऋषीकेश देशमाने, मृणाली सावंत यांनी उत्तम अभिनयाने एकांकिका सजवली. रणवीरसिंग चौधरी विद्यापीठ नीर निरूपण एकांकिकेतून पाणी बचतीचे महत्त्व स्पष्ट केले. एसएनडीटी विद्यापीठाने कामवाल्या बायकांचे दुःख मांडून स्त्रीचा जन्म केवळ दुःख भोगण्यासाठी झाला नसल्याचा संदेश दिला. त्यांच्या एकांकिकेला टाळ्यांचा कडकडाट मिळाला. सोलापूर विद्यापीठाने 'मजार' एकांकिकेतून पाकिस्तानातून आलेल्या हिंदू महिलेला मुस्लिम भारतीय सैनिकाने दिलेल्या सन्मानजनक वागणुकीची मांडणी केली.

वेस्टर्न सोलो प्रकारात चौदा विद्यापीठे सहभागी झाली होती. लोककला केंद्रात सकाळच्या सत्रात वेस्टर्न सोलो प्रकाराने उपस्थितांना थक्क केले. पाश्चात्त्य संगीताच्या ठेक्यावर गायकांचे सूर अनेकांच्या कानात घुमत राहिले. छत्रपती शाहू महाराज (कानपूर), सावित्रीबाई फुले (पुणे), विद्यासागर (मिदनापूर, पश्चिम बंगाल), कालिकत (केरळ), बंगळूर (कर्नाटक), बनारस हिंदू (उत्तर प्रदेश), सरदार पटेल (गुजरात), राणी दुर्गावती (जबलपूर), मुंबई (महाराष्ट्र), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (नागपूर), संत गाडगे बाबा (अमरावती), महात्मा गांधी (अलिगड), गुरू नानक (अमृतसर) विद्यापीठाने सोलो प्रकारात सहभागी झाली.

### साहित्याची रंगली चर्चा

**चंदीगड विद्यापीठाने किंग ऑफ ट्रॅजेडी विषयावरील एकांकिकेची विद्यापीठ वर्तुळात जाहिरात केली होती. सर्व कँटीनच्या परिसरात त्याचे पत्रक चिकटविले होते. विशेष म्हणजे एकांकिकेसाठी त्यांनी एक ट्रक साहित्य आणले होते. त्यात चार्लीच्या पुतळ्यांसह विविध लाकडी आकृत्यांचा समावेश होता. त्यांच्या एकांकिकेला टाळ्यांचा जोरदार प्रतिसाद तर मिळालाच, शिवाय त्यांनी वापरलेल्या साहित्याची चर्चा चांगलीच रंगली.**

### आज होणारे कार्यक्रम असे :

- ९ : ३०
- वादविवाद (नीलांबरी हॉल)
- इन्स्टॉलेशन (मानव्यशास्त्र सभागृह)
- १० : ००
- सुगम गायन-भारतीय (लोककला केंद्र)
- एकांकिका (भाषाभवन)
- १ : ००
- प्रश्नमंजूषा (नीलांबरी हॉल)
- व्यंग्यचित्रकला (मानव्यशास्त्र सभागृह)
- २ : ००
- समूहगीत-भारतीय (लोककला केंद्र)
- ४ : ००
- शास्त्रीय गायन (संगीत व नाट्यशास्त्र विभाग)
- क्ले मॉडेलिंग (संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग)
- ६ : ००
- मूकनाट्य (भाषाभवन)

# जीवनसंगीत सुनो...!

## पाश्चिमात्य संगीताचे जल्लोषी यूथ 'बीटस्'

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : संगीत कोणत्याही प्रकारचं असो, त्यात माणसाच्या जगण्याचा आविष्कारच ओसंडून भरलेला असतो... संगीत शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि एकूणच भारतीय असो किंवा पाश्चिमात्य, ते प्रत्येकाच्या हृदयाचा ठाव घेतं...'संगीत है ये संगीत है- जीवनसंगीत सुनो' अशी साद घालत देशभरातून आलेल्या तरुणाईने आज पाश्चिमात्य संगीताची जणू अद्‌भुत श्रवणयात्राच घडवली.




कोल्हापूर : लोककला केंद्रात शनिवारी पाश्चिमात्य समूहगीत सादर करताना चंदीगड विद्यापीठाच्या विद्यार्थिनी.

(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

### कोलाज अन् भारतीय संगीत

**एकीकडे पाश्चिमात्य संगीताची आनंदानुभूती लोककेंद्रात मिळत होती. त्याचवेळी संगीत व नाट्यशास्त्र विभागात भारतीय संगीताचे सोलो सादरीकरण सुरू होते आणि मानव्यशास्त्र विभागात 'कोलाज' कलाविष्कार घडत होता. एकूणच या साऱ्या कलाविष्कारात तरुणाईची 'क्रिएटिव्हिटी' पणाला लागली होती आणि तितकीच उत्स्फूर्त दाद प्रत्येक सादरीकरणाला मिळत होती.**

शिवोत्सवाचा आजचा दिवस उजाडला तोच मुळी वेस्टर्न सोलो सादरीकरणाने. अर्थात पाश्चिमात्य सूर-तालांची गट्टी सकाळपासूनच जमली. या संगीतातील विविध प्रवाह उलगडू लागले आणि पाश्चिमात्य फोटो-संगीतावर यूथ बीटस्‌चा जल्लोष सुरू झाला. पाश्चिमात्य संगीत जसा आनंद देते, तसाच विरहही तितक्याच सुंदरपणे मांडते. त्याचवेळी विद्रोह आणि असंतोष प्रकट करतानाही तितकाच सळसळता आविष्कार घडवते. अलीकडच्या काळात तर पाश्चिमात्य संगीतानेही भारतीय संगीताला सामावून घेतले आहे. एकूणच हे सारे प्रवाह तरुणाई आपापल्या कलाविष्कारातून अफलातून सादर करत होती. त्यातही समूह गीतांतील सादरीकरण स्वरांकित करताना सूर व तालांचा सुरेख मिलाफ घडत होता. कधी हवेची फुंकर, कधी टाळ्यांचा कमी-अधिक वापर करून तर कधी पायांच्या हालचालीतून विविध आवाजांची अनुभूती देत हा सामूहिक आविष्कार सजत होता. तरुणाईच्या या प्रत्येक प्रयोगाला भरभरून दाद मिळत होती आणि टाळ्या-शिट्यांची ही उत्स्फूर्त दाद घेत एकापाठोपाठ एक सरस आविष्कार सजत होता. लोककला केंद्रात सकाळी दहापासून सुरू झालेली ही पाश्चिमात्य संगीताची अनोखी मैफल सायंकाळी साडेपाचपर्यंत सुरू राहिली आणि मावळतीच्या सूर्याच्या साक्षीने पुढे साऱ्यांनाच लोक वाद्यवृंदाच्या सादरीकरणाची आस लागली.

# महोत्सवात कैलाश छा गया

## आगळ्यावेगळ्या 'हेअर स्टाइल'ने विद्यापीठात चर्चेत

**संदीप खांडेकर :** सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : बाराशेहून अधिक कलाकारांचा भरणा. प्रत्येक जण आपल्या संस्कृतीने नटलेला; पण त्यातही केरळमधला कैलाश चंद्रनच प्रत्येकाच्या नजरेत भरला आहे. त्याने केलेली खास 'हेअर स्टाइल' हे त्यामागचे कारण आहे. सत्यसाईबाबांप्रमाणे त्याची ही स्टाइल शिवोत्सवात चर्चेची तर ठरली आहेच; शिवाय त्याच्या सोबत सेल्फी घेण्याचा मोह अनेकांना आवरेनासा झाला आहे.

कैलाश हा केरळ विद्यापीठाचा विद्यार्थी. तो मूळचा त्रिवेंद्रमचा असून, अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात शिकत आहे. गायक म्हणून तो महोत्सवात सहभागी झाला असून, केरळ विद्यापीठाला गायनाच्या क्षेत्रात बक्षीस मिळवून द्यावे, यासाठी तो आला आहे. मात्र तो डोक्यावर वाढविलेल्या वर्तुळाकार कुरळ्या केसांच्या स्टाईलनेमुळे चर्चेत आला आहे. त्याची आई शासकीय सेवेत असून, वडील अभियांत्रिकी फॅब्रिकेटर्सच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्याची बहीणसुद्धा अभियांत्रिकीचे



**कोल्हापूर : वैशिष्ट्यपूर्ण केशरचनेने आकर्षण ठरलेला केरळ विद्यापीठाचा विद्यार्थी कैलाश चंद्रन.**

शिक्षण घेत आहे. त्याच्या या कुटुंबीयांचा मात्र त्याच्या हेअर स्टाईलला कसलाच विरोध नाही, हे विशेष. गेल्या तीन वर्षांपासून त्याने ही खास हेअर स्टाईल ठेवली आहे.

एकवीस वर्षीय कैलाशने आपण इतरांहून वेगळे दिसावे, आपली स्वतंत्र ओळख असावी, या उद्देशाने ही हेअर स्टाईल केली आहे. केसांची खास अशी निगा राखण्याचे कामही त्याला करावे लागत आहे. डोक्यावर सुमारे फूटभर कुरळ्या केसांचे हे ओझे वाहताना

### सेल्फीसाठी उत्सुकता

**हेअर स्टाईलमुळे चर्चेत आल्याने कैलाशसमवेत सेल्फी काढण्यासाठी विद्यार्थी उत्सुक असल्याचे दिसत आहेत. तो मात्र गायनात विद्यापीठाला बक्षीस मिळवून द्यावे, यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे.**

मात्र तो कुणाचीच पर्वा करत नाही. काही जण त्याच्या या स्टाईलकडे पाहून हसतात, काहींना त्याचा हा पोरकटपणाही वाटतो. प्रत्येकाला त्याने काय करावे, याचे जसे स्वातंत्र्य असते, तसे मलाही असल्याने मी ही हेअर स्टाईल केल्याचे तो बिनधास्त सांगतो.

मल्याळम भाषेतील एका टीव्ही मालिकेतील कलाकाराची केशरचना याच पद्धतीची आहे. याचा अर्थ त्याचे मी अनुकरण केलेले नाही, अशी कबुलीही तो देतो.

# चित्र, संगीत, बौद्धिकतेचा सर्वांगसुंदर मिलाफ

## तरुणाईचा लक्षणीय प्रतिसाद; उत्साह द्विगुणित

कोल्हापूर, ता. ११ : कलात्मकता, बुद्धिमत्ता आणि कौशल्य अशा विविध गुणांचे दर्शन घडविणाऱ्या 'शिवोत्सव २०१७' या राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागींनी चित्रकला, प्रश्नमंजूषा, संगीतवादन स्पर्धांद्वारे विशेष कौशल्य येथे सिद्ध केले. तरुणाईकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी उत्साह द्विगुणित झाला.

संगीत व नाट्यशास्त्र विभागांतील दालनात दिग्गज कलावंतांच्या संगीतवादनाशी स्पर्धा होऊ शकेल, अशा तोडीची संगीतवादन स्पर्धा झाली. यात कर्नाटक विद्यापीठाच्या वी. केवल याने बासरीवादन सादर केलेला राग 'देस' दाद देणारा ठरला. हल्ली शास्त्रीय संगीत गाणारा व ऐकणारा वर्ग कमी झाला आहे असा सरसकट होणारा आरोप खोडून निघावा असा प्रतिसाद येथे तरुणाईने दिला. त्या वयातील वादकांनी राग 'देस', मालकंस, नट भैरव, मियाका तोडी राग सादर केले. तबलावादनात पंजाबी तोडा, कायदा, रेला, टप्पे अशा संगीत वादनांतील सूर-तालाच्या छटा सादर केल्या. त्याला वेळोवेळी टाळ्यांच्या गजरात दाद देत तब्बल दोन तास रंगून गेले. येथे सुमारी २२ कलावंतांनी केलेले वाद्यांचे वादन व तरुणाईचा प्रतिसाद हा भारतीय संगीताचे भवितव्य उज्ज्वल असल्याची साक्ष देणारी मिळाली.

अर्थशास्त्र विभागाच्या दालनात चित्रकला स्पर्धा झाल्या. यात १६ विद्यापीठांच्या चित्रकारांनी सहभाग घेतला. 'जगण्यातील आनंदी क्षण' असा आशय घेऊन येथे चित्रकारांनी मांडणी केली. कोणी जलरंगात, कोणी पोस्टर रंगात तर कोणी केवळ पेन्सील शेडिंग अशा प्रकारांत चित्रे रेखाटली. यात व्यक्ती चित्रांपासून स्थिर चित्रापर्यंतचा समावेश होता यात मनात येईल त्या कल्पना घेऊन साकारलेल्या रंग रेखा, आडव्या, उभ्या, गोल, तिरप्या अशा रेखांकनात रंग भरले गेले. जीवशास्त्र विभागात झालेल्या प्रश्नमंजूषा कार्यक्रम विविध कार्यक्रम अभ्यासक्रमाबरोबर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील विषयातील प्रश्नांना समर्पक उत्तर देत आपल्या बौद्धिक क्षमतेची चुणूक दाखविली. यात १२ विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



**कोल्हापूर : शिवोत्सवातील फोक ऑर्केस्ट्रा पाहण्यास लोककला केंद्रात झालेली तुडुंब गर्दी.**
**(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)**

# लोकसंगीताने गाजला दिवस

## 'फोक ऑर्केस्ट्रा'ला प्रतिसाद : जल्लोषाला उधाण

कोल्हापूर, ता. ११ : तंतुवाद्य, घंटीचा किणकिणाट, ढोलकीचा धमाका, संवादिनीचे मंजूळ तितकेच अवखळ सूर, वासरीचे कोमल स्वर आणि ढोलकी, तबला-मृदंगाचा तालबद्ध ठेका अशा पूर्णतः भारतीय पारंपरिक संगीत वाद्यांच्या गजराने 'शिवोत्सव २०१७'चा दुसरा दिवस गाजला. लक्षवेधी पारंपरिक वेशभूषेतून नटलेल्या-सजलेल्या कलावंतांनी एकाच वेळी डझनभर वाद्यांचा सुरेख मेळ साधला. जवळपास शंभरावर वाद्यांच्या सुरेल तितक्याच तालबद्ध समूहवादनाने देशातील उत्तर, पूर्व, दक्षिण सांस्कृतिक एकात्मतेला साद घातली. या जोषपूर्ण वादनातून रंगलेल्या दीड तासाच्या जुगलबंदीत टाळ्या-शिट्ट्या व जल्लोषाला उधाण आले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या 'शिवोत्सव २०१७'साठी देशातील विविध विद्यापीठांच्या कलावंतांनी लोककलांचे बहारदार सादरीकरण केले. 'फोक ऑर्केस्ट्रा' या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम झाला. यात पहिल्या सत्रात उत्तर भारतीय लोकसंगीताचा बाज असलेली धून गुजरात विद्यापीठाने सादर करताच उत्साह भरला. त्यापाठोपाठ दाक्षिणात्य नृत्याविष्कार असलेले सादरीकरण केरळ विद्यापीठाच्या संघाने केले. त्यानंतर आंध्र प्रदेश विद्यापीठ, पश्चिम बंगाल, कर्नाटक विद्यापीठाच्या संघांनी तोच रंगारंग टिकवून ठेवत लोकसंगीत वादनाच्या समृद्ध छटा दर्शविल्या.

सर्वच संघांनी केवळ पारंपरिक वाद्याचे वादन केले. यात ढोलकी, दिमडी, टाळ, झांज, मंदिरा, मृदंगाचे सहा प्रकार झांज, ढग्गा, बांबू, एकतारी, दोन तारी, चौंडकं, आठ प्रकारच्या बासरी, गेळू, माठी, घुंगरू, टाळ, वीणा अशा वाद्यांच्या समूहातून साधलेली सांघिक कौशल्य पाहून उपस्थित थक्क झाले.

## कलाविष्कार...




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'शिवोत्सव २०१७'मध्ये शनिवारी गुजरात विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी फोक ऑर्केस्ट्रा सादर करून धमाल उडवून दिली.

(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)